कार्यालयीन उपयोगासाठी

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा मूल्यमापन अहवाल


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,

पुणे – ४११ ००१.

१९९६

# अ नु क्र म णि का


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| प्रकरण -१ | केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची संकल्पना | ४ | ९ |
| प्रकरण-२ | केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष-१९९३-९४ मध्ये झालेल्या खर्चाचे वर्गीकरण | १० | २६ |
| प्रकरण-३ | केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे स्वरुप | १७ | २४ |
| प्रकरण-४ | मूल्यमापन अहवालाचा उद्देश व सर्वेक्षण पध्दती | २५ | २६ |
| प्रकरण-५ | क्षेत्रीय पाहणीतील निष्कर्ष तसेच सूचना तथा शिफारशी | २७ | ३५ |
| *परिशिष्ट-१* | *केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सूची* | ३६ | ४१ |
| *परिशिष्ट-२* | *प्रपत्र-१ लाभधारकांची माहिती* | ४२ | ४६ |
| *परिशिष्ट-३* | *प्रपत्र-२ योजना राबविण्याऱ्या यंत्रणेकरिता* | ४७ | ४८ |

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या क्षेत्रात भौगोलिक व नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता यामध्ये तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीमधील विपुलता, विविधता अथवा त्रुटी भिन्न आहेत. त्यामुळे ठराविक साच्याचेच कार्यक्रम सर्वच प्रकल्प क्षेत्रात आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाहीत. म्हणून ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात केलेला नाही, अशा व ज्या योजना आदिवासींच्या कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालामानानुसार निकडीच्या आहेत, अशा योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (Nucleus Budget) स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे राबवून त्यांचा लाभ आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे ही या योजनेची प्रमुख संकल्पना आहे.

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र.आरएसटी-१०८०/३८५/का.१४ (१), दिनांक ११ मे,१९८१ अन्वये सन १९८१-८२ या वर्षापासून 'न्युक्लिअस बजेट' ही योजना शासनाच्या नियंत्रणाखाली प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत राबविण्यात येते.

प्रत्येक प्रकल्प कार्यक्षेत्रातील भौगोलिक व नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता विचारात घेता स्थलकालानुरुप लवचिक व अभिनव कार्यक्रम स्थानिक पातळीवर तातडीने कार्यान्वित करता यावेत या उद्देशाने तसेच ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही, अशा स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर अशा आदिवासी विकास योजनांची त्वरेने व प्रभावीपणे आखणी व अंमलबजावणी करता यावी म्हणून न्युक्लिअस बजेटचा स्वतंत्र निधी प्रकल्प अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिला जातो.

यापूर्वी या संस्थेने 'न्युक्लिअस बजेट' अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांविषयक अभ्यास अहवाल सन १९८६ मध्ये केला होता. तथापि तदनंतरच्या कालावधीत नियोजनांच्या पध्दतीत व आर्थिक विकासाच्या संकल्पनात अनेक बदल झाले. सदर योजना अत्यंत प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी शासनाने १२ मे, १९९२ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना व मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. कालौघात बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे तसेच शासन, स्वयंसेवी संस्था व इतर घटकांमार्फत आदिवासींचे राहणीमान उंचावण्यासाठी सतत अविरत प्रयत्न चालू आहेत. शासनाने पुरविलेल्या सुविधांमुळे आदिवासींचा संपर्क नागरी विभागांशी, जनतेशी आला व साहजिकच त्यामुळे त्यांच्या राहणीमानाच्या पध्दतीतही लक्षणीय बदल घडून आला. आदिवासी समाज हा त्यांच्यासाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना व लाभांविषयी अधिक जागृत झाला आहे.तसेच पूर्वी व सध्या राबविल्या जाणाऱ्या योजनांतही आमुलाग्र बदल घडून आला असल्यामुळे त्याचा योग्य परिणाम आदिवासींचा जीवनस्तर उंचावण्यात झाला आहे. पूर्वीची परिस्थिती व सद्य परिस्थिती यात बरेच अंतर आहे. त्यामुळे राबविल्या जाणाऱ्या योजना, या योजनांमधील आदिवासींचा सहभाग व त्यांना झालेला लाभ याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी या संस्थेने न्युक्लिअस बजेट अंतर्गत राबविलेल्या योजनांची क्षेत्रीय पाहणी करुन हा मूल्यमापन अहवाल तयार केला आहे.

सदर अहवालाचे क्षेत्रीय व मूल्यमापन पाहणीचे काम श्री.मो.रा.गोसावी, सांख्यिकी अधिकारी, श्री.सु.ज.शिंदे, श्री.सो.रा.शेवकरी, संशोधन सहाय्यक व श्री.अ.ना.राऊत, अन्वेषक यांनी केले आहे. तसेच अहवाल प्रारुप लेखनाचे काम श्री.मो.रा.गोसावी, सांख्यिकी अधिकारी यांनी श्री.जी.पी.रामटेके व श्री.डी.एम.रासकर, उपसंचालक यांचे देखरेखीखाली व माझे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. तसेच सदर अहवालाचे टंकलेखन व डी.टी.पी.चे काम श्री.के.पी.कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केलेले आहे.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल योजनांची आखणी व अंमलबजावणी करणारे आदिवासी विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी,आदिवासी विकास योजनांत रस घेणारे अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि संशोधक यांना उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

पुणे

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

दिनांक- २६.१२.९५

## प्रकरण १

# केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची (**Nucleus Budget**) संकल्पना

## *प्रास्ताविक*

१.१ सर्वसाधारणपणे विचार करता असे दिसून येते की, राज्याच्या निरनिराळया क्षेत्रात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातीच्या विकासामध्ये/प्रगतीमध्ये तफावत आहे व त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रम गरजा देखील भिन्न आहेत. प्रत्येक क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि तेथे उपलब्ध असलेली साधन संपत्ती तसेच त्यातील विपुलता अन विविधता अथवा अभाव/त्रुटी भिन्न असल्याने ठराविक साच्याचे किंवा सर्व प्रकल्पाकरिता एकाच प्रकारचे कार्यक्रम आदिवासींच्या विकासाच्या/उन्नतीच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाहीत. या दृष्टीकोनातून आदिवासी विकास कार्यक्रमाच्या योजनांमध्ये स्थलकालानुरुप लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. आदिवासी विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजूरीचे अधिकार प्रदान करुन सदर कार्यक्रम प्रकल्प पातळीवर तातडीने कार्यान्वित करता यावेत, या हेतूने न्युक्लिअस बजेट (Nucleus Budget) 'केंद्रवती अर्थसंकल्प'योजना शासनातर्फे सन १९८१-८२ या वर्षापासून राबविली जात आहे.

## *केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची संकल्पना- विश्लेषण :-*

१.२ ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थानिक परिस्थिती व आदिवासी जमातीच्या विकास प्रक्रियेतील फरक/तफावत यांचे विचारातून अत्यावश्यक आहेत, परंतू त्या योजनांचा समावेश मात्र अर्थसंकल्पात केलेला नाही, अशा अभिनव किंवा स्थलकालानुरुप अन नाविण्यपूर्ण स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीसाठी अडकून न पडता स्थानिक पातळीवरच तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा या योजनेचा गाभा आहे. सदर योजना राबविण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकलप यांचे अधिनस्त ठराविक निधी ठेवण्यात आलेला आहे. त्यास (Nucleus Budget Fund) 'केंद्रवती अर्थसंकल्प निधी' म्हणतात. या निधितून कार्यान्वित करावयाच्या योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती व कुटुंब केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबविण्यात याव्यात म्हणून या योजनेतून मूलभूत सोयी किंवा पदनिर्मिती यावर काही निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

१. या निधीतून मंजूर होणाऱ्या योजना राबविण्यासाठी कोणतेही नवीन पद निर्माण करता येणार नाही, तथापि, कार्यक्रमाचे स्वरुप किंवा योजनेचे स्वरुप लक्षात घेऊन केवळ अल्प कालावधीकरिता मानधन आधारे अत्यावशयक तेथे काही व्यक्तींच्या सेवांचा उपयोग या कामासाठी करुन घेता येईल.

२. मूलभूत सोयी (पायाभूत सोयी) (Infrastruture Facilities) च्या निर्मितीवर येणारा खर्च अत्यंत मर्यादित स्वरुपाचा असावा. केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबवावयाच्या योजनांचा एक भाग म्हणून मूलभूत सुखसोयी पुरविणे आवश्यक असल्यास अशा सोयींचा/सुविधांचा खर्च योजनेच्या एकूण खर्चाच्या १० टक्केपेक्षा जास्त असू नये.

३. न्युक्लिअस बजेट मधील योजनांमध्ये लाभार्थींना 'कर्ज देणे ' अपेक्षित नाही.

### *केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांचे स्वरुप*

१.३ राज्य शासनाने शासन निर्णय क्र.टीएसपी/न्यूबयो-११९२/प्र.क्र.७/का.५, दिनांक १२ मे, १९९२ साली न्युक्लिअस बजेट योजनांचे गट ठरवून दिलेले आहेत.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास, यांचे नियंत्रणाखाली राबविण्यात येणाऱ्या न्युक्लिअस बजेटमधील योजनांमध्ये लाभार्थ्यांना कर्ज देणे अपेक्षित नाही. न्युक्लिअस बजेट अंतर्गत घ्यावयाच्या योजनांबाबत फार मोठ्या प्रमाणावर मुभा असली तरी या योजनांचा खरा उद्देश लक्षात घेऊनच या योजनांचे खाली दर्शविल्याप्रमाणे ४ प्रमुख भाग पाडण्यात आले आहेत.

#### *१.३.१ उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना*

या स्वरुपाच्या योजनांमध्ये सर्वसाधारणत: शेती उत्पन्न वाढविणे, लहान लहान सिंचन योजना. इनवेल बोअर, सिंचनासाठी कूपनलिका,सिंचनासाठी पी.व्ही.सी.पाईप किंवा तत्सम पाईप पुरविणे, दुग्धव्यवसाय संवर्धन, पशुविकास व फळबाग विकास, मत्स्य व्यवसाय विकास, कुटीरोद्योग, हस्तकला व्यवसाय, रेशीम तथा कोसा उत्पादन, मधुमक्षिकापालन इ. विकास शीर्षाखाली वैयक्तिक लाभाच्या किंवा कुटुंब लाभाच्या योजनांचा समावेश होतो. सदर योजनांचे आदिवासी लाभार्थींना पुरेसे ज्ञान किंवा कौशल्य प्राप्त करुन देण्यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाचा व प्रात्यक्षिकांचा समावेश अशा योजनांमध्ये होईल. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवावयाला हवी की, ज्या योजना अर्थसंकल्पात समाविष्ट असतील तर अशा योजना न्युक्लिअस बजेट अंतर्गत घेता येत नाहीत. उत्पन्न निर्मितीच्या योजनांत लाभार्थींचा काही आर्थिक सहभाग असणे आवश्यक आहे.

#### *१.३.२ प्रशिक्षणाच्या योजना*

या योजनाअंतर्गत आदिवासी व्यक्तींना रोजगार मिळविण्यासाठी किंवा नोकरी मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होतील, अशा प्रशिक्षणाच्या योजना प्रामुख्याने घेण्यात याव्यात. अशा योजनांमध्ये विविध स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी (१) प्रशिक्षण व उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे (२) संगणक प्रशिक्षण (३) टंकलेखन व लघुलेखन (४) शिवणकाम (५) सुतारकाम (६) वायरमन (७) रेडिओ/टीव्ही मॅकेनिक (८) स्कूटर/मोटर मॅकेनिक (९) वाहनचालक प्रशिक्षण (१०) सशस्त्र दल, राज्य राखीव दल किंवा केंद्र/राज्य शासनाच्या निमलष्करी दल भरतीपूर्व प्रशिक्षण (११) नोकरी मिळविण्यास उपयुक्त प्रशिक्षण इ.योजनांचा समावेश होतो.

प्रशिक्षण योजनेला मंजूरी देण्यापूर्वी निर्देश समितीने अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना कोणत्या नोकरी/रोजगार यामध्ये किती जागा नजिकच्या भविष्यात अपेक्षित आहेत, त्याचा अंदाज घेऊन नंतर त्यानुसार मान्यता द्यावी, प्रशिक्षण घेणाऱ्या संस्था/व्यक्ती आणि अभ्यासक्रम अधिकृत मान्यताप्राप्त असावेत.

#### १.३.३. *मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना*

यामध्ये सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण योजना, क्रीडा, कला, साहित्य व संस्कृती यांची जोपासना तथा संवर्धन करणाऱ्या योजना/कार्यक्रमांचा समावेश होतो. आदिवासींची गुणवत्ता, व्यक्तीमत्व विकासाच्या विविध योजनांच्या मागे त्यांना सुविधा, सुदृढ व समृध्द नागरिक बनविण्याचा उपक्रमांचा अंतिम उद्देश आहे. या दृष्टीने निवडक प्रमाणावर महत्वाच्या क्रीडा स्पर्धा भरविणे, आदिवासींच्या पारंपारिक कलाकृतीचे प्रदर्शन आयोजित करणे, तसेच नृत्यकलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी उद्‌बोधन

व ज्ञानवर्धक शिबिरे, मेळावे भरविणे, आश्रमशाळेतील शिक्षकांसाठी कार्यशाळा, उद्बोधन वर्ग आयोजित करणे, सुसंस्कार मंडळांना प्रोत्साहित करणे, युवा व महिला मंडळाच्या रचनात्मक उपक्रमांना सहाय्य करणे, सामुहिक विवाह आयोजित करुन त्यातील जोडप्यांना अभिनव अन कल्पक संसारोपयोगी वस्तुंचे सहाय्य करणे, अशा प्रकारच्या योजना स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन कार्यान्वित करतात.

*१.३.४ आदिवासी कल्याणात्मक योजना*

आदिवासींच्या त्या त्या भागातील गरजा आणि समस्यांवर आधारीत अशा वैयक्तिक आणि सामुहिक कल्याणाच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरणाऱ्या काही योजना या सदराखाली घेता येतात. अशा योजनांमध्ये घरकुलाचे विद्युतीकरण, बाल व महिला कल्याणासाठी अभिनव उपक्रम, आदिवासींवरील आपत्कालीन किंवा अत्याचार प्रकरणी अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीचे सहाय्य देणे, इ.चा समावेश होतो.

१.४. उपरोक्त चार गटांमध्ये वेगवेगळया योजनांची नांवे उदाहरणादाखल देण्यात आली आहेत, म्हणून ती यादी परिपूर्ण किंवा सर्वसमावेशक नाही. या योजनाशिवाय इतर प्रकारच्या योजना न्युक्लिअस् बजेट अंतर्गत घेण्याची मुभा निर्देश समितीला आहे.

१.५ योजनांसाठी आर्थिक सहाय्य कार्यक्रम

१.५.१. वैयक्तिक लाभार्थींना अर्थसहाय्याच्या मर्यादा

न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत आदिवासी व्यक्तीस/कुटुंबास लाभाची आर्थिक मर्यादा रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) असते. दोन किंवा तीन किंवा त्यापेक्षा अधिक आदिवासी लाभार्थी एकत्र येऊन सामुहिक प्रकल्प/कार्यक्रम कार्यान्वित करु शकतात. परंतू त्यासाठी व्यक्तीगत ठरविलेली आर्थिक मर्यादा रु.१०,०००/- (प्रत्येक आदिवासी लाभार्थीस) याप्रमाणेच राहते.

१.५.२ प्रशिक्षणाच्या योजना

मानव साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना आणि आदिवासी कल्याणाच्या योजना या योजनेखाली देऊ केलेले अर्थसहाय्य हे १०० टक्के अनुदान स्वरुपात असते. तर उत्पन्न निर्मितीच्या अथवा उत्पन्नवाढीच्या योजनेखाली अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे असते.

| अ.क्र. | तपशील | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १. | सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी | ५० टक्के |
| २. | आदिम जमातीचे लाभार्थी | ८० टक्के |
| ३. | जेथे सहाय्य रु.२०००/- पेक्षा कमी व लाभधारक दारिद्र रेषेखालील | १०० टक्के |

वरील अनुदान टक्केवारीच्या रक्कमेव्यतिरिक्त उरलेली रक्कम ही लाभार्थीने स्वत:ची वर्गणी म्हणून भरावयाची असते.

१.६ न्युक्लिअस बजेट अंतर्गत कार्यक्रम मंजूरीचे वित्तीय अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | लाभार्थी योजना | आर्थिक मर्यादा | मंजूरी देणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | वैयक्तिक किंवा सामुहिक लाभाच्या योजना (प्रत्येकी रु.१०,०००/- च्या अटीस अधीन राहून) | ५ लाख | अपर आयुक्त, आदिवासी विकास, यांचे अध्यक्षतेखालील निर्देशन समिती |
| २. | रु.५ लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या सामुहिक योजना (प्रत्येकी रु.१०,०००/- च्या अटीस अधीन राहून) | २० लाख | आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक |
| ३. | रु.२० लाखापेक्षा जास्त खर्चाच्या सामुहिक योजना (प्रत्येकी रु.१०,०००/- च्या अटीस अधीन राहून) | - | सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |

१.७ निर्देश समिती- रचना व कार्यपध्दती

*अ) रचना*

न्युक्लिअस बजेट अंतर्गत कार्यक्रम मंजूरीसाठी व देखरेखीसाठी प्रकल्पनिहाय निर्देश समिती तयार केली असून तिची रचना खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अपर आयुक्त, आदिवासी विकास | अध्यक्ष |
| २. | शासनाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती | सदस्य |
| ३. | संबंधित विभागाचे योजना प्रस्तावित करणारे किंवा अंमलबजावणी करणारे अधिकारी | सदस्य |
| ४. | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य-सचिव |

*ब) कार्यपध्दती*

संबंधित प्रकल्प अधिकारी नवीन आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी पुढील आर्थिक वर्षात न्युक्लिअस बजेट अंतर्गत राबवावयाच्या योजनांचे किंवा कार्यक्रमांचे प्रस्ताव विविध विभागाच्या /खात्याच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून मागवून घेतात व निर्देश समितीच्या संमतीने एक वार्षिक योजना ३० एप्रिल पूर्वी आखतात. उपलब्ध आर्थिक तरतूद व कालानुरुप अत्यावश्यक गरजा किंवा महत्वाचे संदर्भ विचारात घेऊन आर्थिक नियोजनात त्यानुसार अंशतः बदल करण्याचे अधिकार निर्देश समितीला देण्यात आले आहेत.

निर्देश समितीने मंजूर केलेल्या न्युक्लिअस बजेट खालील योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीस विविध विभागाचे/खात्याचे जिल्हास्तरीय अधिकारी जबाबदार असतात.

१.८ प्रकल्प अधिकारी/अपर आयुक्त यांचे अधिकार

१.८.१ प्रकल्प अधिकारी अशा अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी प्रगती अहवाल मागवितात. या योजना उद्दिष्टानुसार राबविल्या जात आहेत किंवा कसे यासंबंधीचे निरीक्षण करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना देण्यात आले आहेत. प्रकल्प अधिकारी त्यांच्या प्रकल्पांतर्गत राबविल्या जात असलेल्या योजनाविषयी निर्देश समितीला माहिती देतात. योजना राबविणारे अंमलबजावणी अधिकारी यांनी योजनेच्या त्रुटी व शर्तीनुसार योजना पूर्ण केल्याचे 'उपयोगिता प्रमाणपत्र' प्रकल्प अधिकारी यांना सादर करावयाचे असते. सदर प्रमाणपत्र योजना पूर्ण झाल्यापासून तीन महिन्याचे आत प्रकल्प अधिकाऱ्यांना सादर करणे बंधनकारक असते.

१.८.२ न्युक्लिअस बजेट अंतर्गत अंमलबजावणीविषयी परिणामकारकता व लाभ यासंबंधी मूल्यमापन करण्याची जबाबदारी प्रामुख्याने प्रकल्प अधिकारी यांचेवर असते. याशिवाय अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी देखील दरवर्षी निदान १० टक्के योजनांची पाहणी करुन त्यांचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे पाठवावयाचा असतो. त्यानंतर अपर आयुक्त, कार्यालयातील 'लेखा परीक्षक पथक' यांच्या सहाय्याने अपर आयुक्त यांनी न्युक्लिअस बजेट अंतर्गत घेतलेल्या योजनांचे मूल्यमापन करावयाचे असते.

१.८.३ निर्देश समितीचे सदस्य सचिव या नात्याने प्रकल्प अधिकारी यांनी दर तीन महिन्याच्या काळात कमीत कमी त्यांचे कार्यक्षेत्रात निर्देश समितीची बैठक/सभा घेऊन योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यायचा असतो. तसेच आवश्यकतेनुसार नवीन/सुधारीत योजनांना मंजूरी प्राप्त करुन घ्यायची असते.

१.८.४ निर्देश समितीच्या सभेचे इतिवृत्त कार्यवृत्त ठेवण्यासाठी एका पक्क्या बांधणीची कायम स्वरुपी नोंदवही ठेऊन त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या बैठकांचे/सभांचे इतिवृत्त प्रकल्प अधिकारी यांनी नोंदवावयाचे असून सदर नोंदवही कायम स्वरुपात जतन करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

१.८.५ प्रत्येक योजनेची माहिती एका दृष्टीक्षेपात उपलब्ध होण्यासाठी विहित केलेले 'अ' रजिस्टर कायम स्वरुपात प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांचे कार्यालयात ठेवावयाचे आहे. सदर रजिस्टर अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सोपविली आहे.

१.८.६ न्युक्लिअस बजेट अंतर्गत मंजूर झालेल्या योजनेसाठी लागणारे साहित्य महाराष्ट्र आकस्मिकता खर्च नियम-१९६५ मधील नियम १७२ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन खरेदी करण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकाऱ्यांची असते. तथापि, त्यांसंबंधी प्रकल्प अधिकारी यांनी खात्री करुन घ्यावयाची असते.

१.८.७ न्युक्लिअस बजेट अंतर्गत घ्यावयाच्या योजनेखालील खर्चाच्या विविध बाबींची काळजीपूर्वक छाननी निर्देश समितीने करावयाची असते. विशेषत: खर्च वाजवी आणि समर्थनीय असल्याची खात्री करुनच मंजूरी द्यावयाची असते.

१.८.८ ज्या प्रकल्पांमध्ये घोषित केलेल्या आदिम जमातीचे वास्तव्य आहे. त्या प्रकल्पात त्या जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेऊन त्या प्रमाणात न्युक्लिअस बजेटचा निधी त्यांच्या विविध विकास योजनांवर खर्च करण्यात येतो.

१.८.९ ज्या योजनांमध्ये लाभार्थींनी १०० टक्क्यापेक्षा कमी अनुदान अनुज्ञेय आहे, अशा योजनांमध्ये उर्वरित रक्कम लाभधारकांचा सहभाग मानण्यात येणार असून ती रक्कम लाभार्थींनी स्वत: प्रकल्प अधिकारी कार्यालयात भरावयाची असते. त्यामुळे प्रकल्प अधिकाऱ्यांनी कर्जाचे हिशोब ठेवण्याची आवश्यकता नसते.

१.८.१० अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या एखाद्या योजनेवर अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पूरक खर्च न्युक्लिअस बजेटमधून करावयाचा असल्यास असे प्रकरण आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात येते.

१.८.११ शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार जे कार्यक्रम न्युक्लिअस बजेट अंतर्गत घेता येत नाहीत, परंतू स्थानिक परिस्थितीनुसार खास कार्यक्रम घेणे अत्यावश्यक आहे,असे निर्देश समितीला वाटल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचा असतो.

## प्रकरण २

### वर्ष १९९३-९४ मध्ये केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गतआर्थिक तरतूद व झालेला खर्च यांचा आढावा

२.१ राज्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांसाठी केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये केलेली आर्थिक तरतूद व झालेला प्रत्यक्ष खर्च विषयी माहिती मागविण्यात आली. तसेच मा.आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयाकडूनही माहिती संकलित करण्यात आली. या सर्व माहितीचे स्थूल वर्गीकरण करुन विविध तक्ते तयार करण्यात आले असून या तक्त्यांवरुन प्रकल्पनिहाय तसेच गटनिहाय झालेल्या खर्चाचा कल लक्षात येतो. हे विविध तक्ते पुढे दिग्दर्शित केलेले आहेत.

तक्ता क्र.२.१

केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत वर्ष १९९२-९३ व १९९३-९४ वर्षात महाराष्ट्र राज्यातील वित्तीय तरतूद व खर्च

(रु.लाखांत)

| अ.क्र. | वर्ष | तरतूद | खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९९२-९३ | ३०२.१६ | ३०९.२० | १०२.३३ |
| २. | १९९३-९४ | ४३४.५२ | ४३४.५२ | १००.०० |

वर्ष १९९२-९३ मध्ये केलेल्या तरतूदीपेक्षा खर्च रु.७.०४ लाख रुपये जास्त झाला असून वर्ष १९९३-९४ मध्ये मागील वर्षापेक्षा १३२.३६ लाख रुपये जास्त तरतूद करण्यात आली. तसेच केलेल्या तरतूदीप्रमाणे १०० टक्के खर्च करण्यात आला आहे.

तक्ता क्र.२.२

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये योजनानिहाय अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्च दर्शविणारा तक्ता

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | स्थूलमानाने योजनांची वर्गवारी | वर्ष १९९३-९४ | | |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजपत्रक **(Budget)** | प्रत्यक्ष खर्च **(Expenditure)** | प्रत्यक्ष खर्चाची अंदाजपत्रकीय तरतूदींशी टक्केवारी |
| १. | उत्पन्न/रोजगार निर्मितीच्या योजना | १५०.५४ | १५०.५४ | १०० |
| २. | प्रशिक्षणाच्या योजना | १२१.४४ | १२१.४४ | १०० |
| ३. | मानव साधन संपत्ती व विकासाच्या योजना | ६५.५१ | ६५.५१ | १०० |
| ४. | कल्याणात्मक योजना | ९७.०३ | ९७.०३ | १०० |
| एकूण | | ४३४.५२ | ४३४.५२ | १०० |

वर्ष १९९३-९४ मध्ये केलेल्या एकूण तरतूदीपैकी ३४.६५ टक्के खर्च उत्पन्न/रोजगार निर्मितीच्या योजना, २७.९५ टक्के खर्च प्रशिक्षणाच्या योजना, १५.०८ टक्के खर्च मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना तसेच २२.३२ टक्के खर्च कल्याणात्मक योजनांसाठी करण्यात आल्याचे दिसून येते

तक्ता क्र.२.३
योजनांच्या स्थूल वर्गवारीनुसार केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पनिहाय झालेला खर्च दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | एकात्मिकआदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | योजनांचे स्वरुप | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (अ) उत्पन्न/रोजगार निर्मितीच्या योजना | (ब) प्रशिक्षणाच्या योजना | (क) मानव साधन संपत्ती व विकासाच्या योजना | (ड) कल्याणात्मक योजना | एकूण |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १. | मुंबई (गोरेगांव) | ४८,००० | २३,००० | ५,००० | ५,००० | ८१,००० |
| २. | डहाणू | ३,४७,८८० | ११,२०,५१३ | ६,५७,०७८ | ४८,१८९ | २१,७३,६६० |
| ३. | जव्हार | ७,६०,६०० | ५,२०,३०० | ३,५३,७०० | ५,०२,४०० | २१,३७,००० |
| ४. | शहापूर | ११,१६,५०० | २,७२,११० | ९,३९५ | २,४३,२२५ | १६,४१,२३० |
| ५. | पेण | ५,००,४७० | ४,८९,८९४ | ४,३८,५५० | ४०,२२० | १४,६९,१३४ |
| ६. | घोडेगांव | १५,६९,४४८ | २,०३,८०४ | ५०,५९८ | - | १८,२३,८५० |
| ७. | कळवण | १०,२६,७५० | ४,७४,३८९ | १,९५,५२० | २,०४,१५६ | १९,००,८१५ |
| ८. | नाशिक | १७,००,३१४ | ६,८४,३३७ | १,९५,३५८ | - | २५,८०,००९ |
| ९. | राजूर | ४,४५,००० | ३,४५,००० | ४,००० | ८,५८,००० | १६,५२,००० |
| १० | यावल | ३,१८,००० | ६,००,१२० | १,२१,६०० | ७९,७९२ | ११,१९,५१२ |
| ११. | तळोदा | ७,८९,५६० | २,४७,७४५ | १,२६,००० | ६,८४,५०० | १८,४७,८०५ |
| १२. | नंदूरबार | १४,६५,५४० | ८,९६,७४५ | ४,८६,२५१ | ५,४३,६९९ | ३३,९२,२३५ |
| १३. | किनवट | १३,६३,००० | ४,१५,००० | २,५५,००० | १,४२,००० | २१,७५,००० |
| १४. | धारणी | ५,००,००० | ३,६२,००० | २,५७,००० | ३६,३३,००० | ४७,५२,००० |
| १५. | अकोला | ७,४२,००० | १,,३८,००० | १,०८,००० | ७९,००० | १०,६७,००० |
| १६. | नागपूर | १,००,००० | ७,०३,९३० | ६३,००० | १०,२०,७७० | १८,८७,७०० |
| १७. | पांढरकवडा | २,३७,५३७ | १३,४४,३५२ | १,६२,९८० | ८,४१,१३२ | २५,८६,००१ |
| १८. | देवरी | ३,८१,४८३ | ७,८४,५५२ | ३४,५९७ | - | १२,००,६३२ |
| १९. | गडचिरोली | ३९,२४० | ५,३९,४७६ | ११,१८,०७८ | २,००,००० | १८,९६,७९४ |
| २०. | अहेरी | ६,५९,०९४ | ३,५१,६५६ | ४,८९,१७६ | ३,००,००० | १७,९९,९२६ |
| २१. | भामरागड | ४,८९,०७९ | १,८२,४४१ | १०,५८,७२६ | ६९,७५४ | १८,००,००० |
| २२. | चंद्रपूर | १,५४,९६० | ६,६४,६८१ | ३१,५५६ | - | ८,५१,१९७ |
| २३. | चिमूर | ३,००,००० | ७,८०,००० | ३३०,००० | २,०८,००० | १६,१८,००० |
| एकूण | | १,५०,५४,४५५ | १,२१,४४,०४५ | ६५,५११,६३ | ९७,०२,८३७ | ४,३४,५२,५०० |

सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांची तुलना करता असे दिसून येते की, धारणी प्रकल्पात सर्वात जास्त म्हणजे ४७.५२ लाख रुपये खर्च झाला असून त्या खालोखाल नंदूरबार (३३.९२ लाख रुपये) व पांढरकवडा (२५.८६ लाख रुपये) या प्रकल्पांचां क्रमांक लागतो. चंद्रपूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात कमी म्हणजे ८.५१ लाख रुपये खर्च करण्यात आले असून सर्वात कमी म्हणजे ८१ हजार रुपये खर्च आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील मुंबई (गोरेगांव) कार्यालयाने केला आहे. तसेच घोडेगांव, नाशिक, देवरी, चंद्रपूर या प्रकल्प कार्यालयाच्या कल्याणात्मक योजनांवरील खर्च निरंक दिसून येतो.

तक्ता क.२.४
केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये रोजगार निर्मितीच्या योजनांसाठी करण्यात आलेली वित्तीय तरतूद व खर्च दर्शविणारा तक्ता ( रुपये लाखांत)

| अ. क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | जिल्हा | वर्ष १९९३-९४ | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | तरतूद | खर्च | |
| १. | मुंबई | मुंबई | ०.४८ | ०.४८ | |
| २.. | डहाणू | ठाणे | ३.४८ | ३.४८ | |
| ३. | जव्हार | ठाणे | ७.६१ | ७.६१ | |
| ४. | शहापूर | ठाणे | ११.१६ | ११.१६ | |
| ५. | पेण | रायगड | ५.०० | ५.०० | |
| ६. | घोडेगांव | पुणे | १५.६९ | १५.६९ | सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये तरतूदीनुसार १०० टक्के खर्चाचे उदिष्टय साध्य करण्या आलेले आहे. |
| ७. | कळवण | नाशिक | १०.२७ | १०.२७ | |
| ८. | नाशिक | नाशिक | १७.०० | १७.०० | |
| ९. | राजूर | अहमदनगर | ४.४५ | ४.४५ | |
| १०. | यावल | जळगांव | ३.१८ | ३.१८ | |
| ११. | तळोदा | धुळे | ७.९० | ७.९० | |
| १२. | नंदूरबार | धुळे | १४.६६ | १४.६६ | |
| १३. | किनवट | नांदेड | १३.६३ | १३.६३ | |
| १४. | धारणी | अमरावती | ५.०० | ५.०० | |
| १५. | अकोला | अकोला | ७.४२ | ७.४२ | |
| १६. | नागपूर | नागपूर | १.०० | १.०० | |
| १७. | पांढरकवडा | यवतमाळ | २.३८ | २.३८ | |
| १८. | देवरी | भंडारा | ३.८१ | ३.८१ | |
| १९. | गडचिरोली | गडचिरोली | ०.३९ | ०.३९ | |
| २०. | अहेरी | गडचिरोली | ६.५९ | ६.५९ | |
| २१. | भामरागड | गडचिरोली | ४.८९ | ४.८९ | |
| २२. | चंद्रपूर | चंद्रपूर | १.५५ | १.५५ | |
| २३. | चिमूर | चंद्रपूर | ३.०० | ३.०० | |
| एकूण | | | १५०.५४ | १५०.५४ | |

रोजगार निर्मितीच्या योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे दिसते की, नाशिक प्रकल्प कार्यालयाने या गटातील योजनांवर सर्वात जास्त म्हणजे १७ लाख रुपये खर्च केले असून त्या खालोखाल घोडेगांव (१५.६९ लाख रुपये) व नंदूरबार (१४.६६ लाख रुपये) या प्रकल्प कार्यालयाचा क्रमांक लागतो. गडचिरोली प्रकल्प कार्यालयाने अशाप्रकारच्या योजनांवर सर्वात कमी म्हणजे ३९ हजार रुपये खर्च केल्याचे दिसून येते.

तक्ता क.२.५
केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये प्रशिक्षण विषयक योजनांसाठी करण्यात आलेली वित्तीय तरतूद व खर्च दर्शविणारा तक्ता

( रुपये लाखांत)

| अ. क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | जिल्हा | वर्ष १९९३-९४ | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | तरतूद | खर्च | |
| १. | मुंबई (गोरेगांव) | मुंबई | ०.२३ | ०.२३ | सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये तरतूदीनुसार १०० टक्के खर्चाचे उदिष्टय साध्य करण्यात आलेले आहे. |
| २. | डहाणू | ठाणे | ११.२१ | ११.२१ | |
| ३. | जव्हार | ठाणे | ५.२० | ५.२० | |
| ४. | शहापूर | ठाणे | २.७२ | २.७२ | |
| ५. | पेण | रायगड | ४.९० | ४.९० | |
| ६. | घोडेगांव | पुणे | २.०४ | २.०४ | |
| ७. | कळवण | नाशिक | ४.७४ | ४.७४ | |
| ८. | नाशिक | नाशिक | ६.८४ | ६.८४ | |
| ९. | राजूर | अहमदनगर | ३.४५ | ३.४५ | |
| १०. | यावल | जळगांव | ६.०० | ६.०० | |
| ११. | तळोदा | धुळे | २.४८ | २.४८ | |
| १२. | नंदूरबार | धुळे | ८.९७ | ८.९७ | |
| १३. | किनवट | नांदेड | ४.१५ | ४.१५ | |
| १४. | धारणी | अमरवती | ३.६२ | ३.६२ | |
| १५. | अकोला | अकोला | १.३८ | १.३८ | |
| १६. | नागपूर | नागपूर | ७.०४ | ७.०४ | |
| १७. | पांढरकवडा | यवतमाळ | १३.४४ | १३.४४ | |
| १८. | देवरी | भंडारा | ७.८५ | ७.८५ | |
| १९. | गडचिरोली | गडचिरोली | ५.३९ | ५.३९ | |
| २०. | अहेरी | गडचिरोली | ३.५२ | ३.५२ | |
| २१. | भामरागड | गडचिरोली | १.८२ | १.८२ | |
| २२. | चंद्रपूर | चंद्रपूर | ६.६५ | ६.६५ | |
| २३. | चिमूर | चंद्रपूर | ७.८० | ७.८० | |
| एकूण | | | १२१.४४ | १२१.४४ | |

राज्यातील विविध प्रकल्प कार्यालयांनी राबविलेल्या प्रशिक्षणाच्या योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे आढळते की, पांढरकवडा प्रकल्प कार्यालयाने या गटातील योजनांवर सर्वात जास्त म्हणजे १३.४४ लाख रुपये खर्च केला असून त्या खालोखाल ११.२१ लाख रुपये व ८.९७ लाख रुपये अनुक्रमे डहाणू व नंदूरबार प्रकल्प कार्यालयाने खर्च केलेले आहेत. या प्रकारच्या योजनांवर सर्वात कमी म्हणजे रु.२३००० इतका खर्च गोरेगांव प्रकल्प कार्यालयाने केलेला असल्याचे आढळते.

तक्ता क.२.६
केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये मानवसाधन संपत्ती व विकास योजनांसाठी करण्यात आलेली वित्तीय तरतूद व खर्च दर्शविणारा तक्ता

( रुपये लाखांत)

| अ. क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | जिल्हा | वर्ष १९९३-९४ | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | तरतूद | खर्च | |
| १. | मुंबई (गोरेगांव) | मुंबई | ०.०५ | ०.०५ | सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये तरतूदीनुसार १०० टक्के खर्चाचे उदिष्टय साध्य करण्यात आलेले आहे. |
| २. | डहाणू | ठाणे | ६.५७ | ६.५७ | |
| ३. | जव्हार | ठाणे | ३.५४ | ३.५४ | |
| ४. | शहापूर | ठाणे | ०.०९ | ०.०९ | |
| ५. | पेण | रायगड | ४.३९ | ४.३९ | |
| ६. | घोडेगांव | पुणे | ०.५१ | ०.५१ | |
| ७. | कळवण | नाशिक | १.९६ | १.९६ | |
| ८. | नाशिक | नाशिक | १.९५ | १.९५ | |
| ९. | राजूर | अहमदनगर | ०.०४ | ०.०४ | |
| १०. | यावल | जळगांव | १.२२ | १.२२ | |
| ११. | तळोदा | धुळे | १.२६ | १.२६ | |
| १२. | नंदूरबार | धुळे | ४.८६ | ४.८६ | |
| १३. | किनवट | नांदेड | २.५५ | २.५५ | |
| १४. | धारणी | अमरवती | २.५७ | २.५७ | |
| १५. | अकोला | अकोला | १.०८ | १.०८ | |
| १६. | नागपूर | नागपूर | ०.६३ | ०.६३ | |
| १७. | पांढरकवडा | यवतमाळ | १.६३ | १.६३ | |
| १८. | देवरी | भंडारा | ०.३४ | ०.३४ | |
| १९. | गडचिरोली | गडचिरोली | ११.१८ | ११..१८ | |
| २०. | अहेरी | गडचिरोली | ४.८९ | ४.८९ | |
| २१. | भामरागड | गडचिरोली | १०.५९ | १०.५९ | |
| २२. | चंद्रपूर | चंद्रपूर | ०.३१ | ०.३१ | |
| २३. | चिमूर | चंद्रपूर | ३.३० | ३.३० | |
| | एकूण | | ६५.५१ | ६५.५१ | |

मानवी साधन संपत्ती विकासाच्या योजनांवर प्रकल्पनिहाय झालेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे आढळले की, गडचिरोली प्रकल्पात या गटातील योजनांवर सर्वात जास्त म्हणजे ११.१८ लाख रुपये खर्च झालेला असून त्या खालोखाल भामरागड व डहाणू प्रकल्पात झालेला आढळतो. अशाप्रकारच्या योजनांमध्ये राजूर प्रकल्पात सर्वात कमी म्हणजे रु.४००० खर्च झाल्याचे दिसून येते.

तक्ता क.२.७


केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये कल्याणात्मक योजनांसाठी करण्यात आलेली वित्तीय तरतूद व खर्च दर्शविणारा तक्ता

( रुपये लाखांत)

| अ. क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नांव | जिल्हा | वर्ष १९९३-९४ | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | तरतूद | खर्च | |
| १. | मुंबई (गोरेगांव) | मुंबई | ०.०५ | ०.०५ | सर्व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये तरतूदीनुसार १०० टक्के खर्चाचे उदिष्टय साध्य करण्यात आलेले आहे. |
| २. | डहाणू | ठाणे | ०.४८ | ०.४८ | |
| ३. | जव्हार | ठाणे | ५.०२ | ५.०२ | |
| ४. | शहापूर | ठाणे | २.४३ | २.४३ | |
| ५. | पेण | रायगड | ०.४० | ०.४० | |
| ६. | घोडेगांव | पुणे | - | - | |
| ७. | कळवण | नाशिक | २.०४ | २.०४ | |
| ८. | नाशिक | नाशिक | - | - | |
| ९. | राजूर | अहमदनगर | ८.५८ | ८.५८ | |
| १०. | यावल | जळगांव | ०.८० | ०.८० | |
| ११. | तळोदा | धुळे | ६.८५ | ६.८५ | |
| १२. | नंदूरबार | धुळे | ५.४४ | ५.४४ | |
| १३. | किनवट | नांदेड | १.४२ | १.४२ | |
| १४. | धारणी | अमरावती | ३६.३३ | ३६.३३ | |
| १५. | अकोला | अकोला | ०.७९ | ०.७९ | |
| १६. | नागपूर | नागपूर | १०.२१ | १०.२१ | |
| १७. | पांढरकवडा | यवतमाळ | ८.४१ | ८.४१ | |
| १८. | देवरी | भंडारा | - | - | |
| १९. | गडचिरोली | गडचिरोली | २.०० | २.०० | |
| २०. | अहेरी | गडचिरोली | ३.०० | ३.०० | |
| २१. | भामरागड | गडचिरोली | ०.७० | ०.७० | |
| २२. | चंद्रपूर | चंद्रपूर | - | - | |
| २३. | चिमूर | चंद्रपूर | २.०८ | २.०८ | |
| | एकूण | | ९७.०३ | ९७.०३ | |

या गटातील योजनांवर धारणी प्रकल्प कार्यालयाने सर्वात जास्त म्हणजे ३६.३३ लाख रुपये खर्च केले असून त्याचे प्रमुख कारण म्हणजे या प्रकल्पात कुपोषणामुळे व झालेल्या बालमृत्युमुळे अशाप्रकारच्या योजनांवर जास्त खर्च करण्यात आलेला आहे. पेण प्रकल्पात कमी म्हणजे ४० हजार रुपये खर्च झाला असून घोडेगांव, नाशिक ,देवरी व चंद्रपूर प्रकल्पांचा खर्च निरंक आहे.

**Schemewise Actual Expenditure Incurred During The Year 1993-94 Under Nucleus Budget.**




## तक्ता क्र. २.८

### वर्ष १९९३-९४ मध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास, कार्यक्षेत्रनिहाय केलेली तरतूद तसेच झालेला खर्च व लाभार्थ्यांची संख्या दर्शविणारा तक्ता

(रुपये लाखांत)

| अ. क्र | अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यक्षेत्राचे नांव | तरतूद | | | खर्च | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राज्य | विशेष केंद्रीय सहाय्य | एकूण | | |
| १ | ठाणे | ५१.८२ | ५१.८२ | १०३.६४ | १०३.६४ | ९१९५ |
| २. | नाशिक | ५०.१३ | ५२.२३ | १०२.३६ | १०२.३६ | ११३४५ |
| ३. | अमरावती | ६३.९९ | ५४.६९ | ११८.६८ | ११८.६८ | ७००१ |
| ४. | नागपूर | ५२.७० | ५७.१४ | १०९.८४ | १०९.८४ | १००९३ |
| | एकूण | २१८.६४ | २१५.८८ | ४३४.५२ | ४३४.५२ | ३७६३४ |

वरील तक्त्यांचा आढावा घेतला असता असे आढळते की, वर्ष १९९३-९४ मध्ये राज्यात ३७,६३४ आदिवासी लाभार्थींनी केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांचा लाभ घेतलेला असून त्यापैकी ११,३४५ लाभार्थी नाशिक विभागातील असून त्यानंतर अनुक्रमे नागपूर, ठाणे व अमरावती विभागाचा क्रमांक लागतो.



Additional Tribal Commissioner Regionwise No. of beneficiaries In Nucleus Budget Scheme For The Year 1993-94
12000
10000
8000
6000
4000
2000
0
No. of Beneficiaries
Thane
Nashik
Amravati
Nagpur
Additional commissioner Region
No. of beneficiaries

# प्रकरण ३ रे

## केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचे स्वरुप

३.१ आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत विविध योजना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येत असून त्यातील निवडक महत्वाच्या योजनांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे :-

१. *योजनेचे नांव :- आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सिंचनाकरिता पी.व्ही.सी पाईपचा पुरवठा करणे. (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी)*

उद्देश :- बऱ्याच आदिवासी शेतकऱ्यांकडे विहिर असून विहिरीवर पंपसेट सुध्दा बसविलेला आहे. परंतू काही वेळेस भिजणारे क्षेत्र पाण्याच्या उदगमापासून लांब असेल तेव्हा विहिरीला/नदीला भरपूर पाणी उपसण्याचे साधन असून देखील जास्त प्रमाणात बागायती करणे शक्य होत नाही. अशावेळेस आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा केला गेल्यास जास्ती जास्त बागायती क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. करिता त्यांचे बागायती क्षेत्रात वाढ करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

वर्णन :- ज्या शेतकऱ्यांकडे बागायती व पाण्याचे साधन म्हणून स्वत:ची विहिर/नदी किंवा बारमाही पाणी असलेला नाला आहे. तसेच पाणी उपसा करण्याकरिता वीजपंप किंवा तेलपंप आहे, अशा आदिवासीं शेतकऱ्यांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येतात. प्राप्त झालेलया अर्जामधून कार्यालयाच्या स्तरावर छाननी करण्यात येते. ज्या शेतकऱ्यांचे अर्ज अटीची पूर्तता करीत असतील अशा शेतकऱ्यांच्या अर्जाचा विचार करुन त्यांना पी.व्ही.सी.पाईप पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात येतो. शासन निर्णय दि.१२ मे,१९९२ च्या तरतूदीनुसार त्यांनी मागणी केलेल्या किंमतीपर्यंतच्या अथवा एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त १०,०००/- कमाल मर्यादेपर्यंत किंमतीच्या पाईपचा पुरवठा करण्यात येतो. मान्य अर्जदारांनी मागणी केल्यानुसार एकूण पाईपच्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम त्यांना नगदी स्वरुपात प्रकल्प कार्यालयास जमा करावी लागते.

पी.व्ही.सी. पाईप खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ यांचेकडून शासनाने ठरवून दिलेले दर मागविण्यात येतात. त्यांनी दिलेल्या दरानुसार (**Rate List**) व ठरवून दिलेल्या कंपनीकडून खरेदी करण्यात येते. त्यामुळे निविदा मागविण्याची गरज भासत नाही. सदर योजना धारणी तालुक्यापुरती मर्यादित असल्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या पी.व्ही.सी.पाईपचा साठा पंचायत समिती, धारणी यांचे गोडाऊनमध्यें ठेवण्यात येतो व आदिवासी कास्तकारांना नियोजित तारखांना बोलावून प्रतिष्ठीत अधिकाऱ्यांकडून छोटासा कार्यक्रम आयोजित करुन वाटप करण्यात येते. यासाठी लागणारा खर्च या योजनेतून भागविण्यात येतो.

ज्या लाभार्थींनी ५० टक्के सहभाग कार्यालयात जमा केला, अशाच लाभार्थ्यांना पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा करण्यात येतो व तेवढ्याच रकमेचे पाईप खरेदी करण्यात येतात.

या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी हे आहेत. वर्ष १९९३-९४ मध्ये या योजनेवर रुपये एक लाख खर्च करण्यात आले.

### ३.१.२ योजनेचे नांव — प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी महिलांना ५० टक्के अनुदानावर शिलाई यंत्र देणे.

*(एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी)*

**उद्देश :-** ज्या आदिवासी महिलांना या योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. अशा महिलांना त्यांचा स्वतःचा व्यवसाय सुरु करुन आर्थिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी ५० टक्के अनुदानावर शिलाई यंत्राचा पुरवठा करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**वर्णन :-** शिवणकाम प्रशिक्षण संपल्यानंतर महिलांना प्रत्येकी एक शिवणयंत्र त्यांचे पसंतीचे पुरविण्यात येते. सदर शिवणयंत्र पुरवितांना जे लाभधारक दारिद्रय रेषेखालील कुटुबांतील असतील, त्यांचेकडे तहसिलदाराचे प्रमाणपत्र असेल, तर त्यांना १०० टक्के अनुदानावर शिलाई यंत्राचा पुरवठा करण्यात येतो व दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र नसेल अशा लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानावर शिवणयंत्राचा पुरवठा करण्यात येतो. त्यासाठी त्यांनी शिलाई मशीनची ५० टक्के रक्कम आपला सहभाग म्हणून कार्यालयात जमा करावी लागते. लाभार्थींना त्यांचे पसंतीनुसार ज्या कंपनीचे शिलाई मशीन आवश्यक आहे. अशा कंपनीची मशीन खरेदी करण्याची कार्यवाही प्रकल्प अधिकारी करतात, त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येतात. निविदेसाठी येणारा जाहिरातीचा खर्च या योजनेतून भागविण्यात येतो. प्राप्त झालेल्या निविदामधून कोणी पुरवठा करावयाचा यांचा अंतिम निर्णय प्रकल्प अधिकारी, घेतात. शिलाई मशीन खरेदी करुन प्रकल्प कार्यालयात ठेवतात व सदर यंत्रे एक छोटासा समारंभ आयोजित करुन शक्यतो एकाच दिवशी लाभार्थ्यांना वाटप करण्यात येतात. यासाठी लागणारा सर्व खर्च सुध्दा या योजनेतून करण्यात येतो.

**अंमलबजावणी अधिकारी:-** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी हे अंमलबजावणी अधिकारी आहेत. वर्ष १९९३-९४ मध्ये या योजनेसाठीं ५० हजार रुपये खर्च करण्यात आला.

### ३.१.३ योजनेचे नांव — आदिवासी तरुणांना तेलइंजिन व विद्युत पंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे

*(एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी)*

**उद्देश** आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी कास्तकारांना १०० टक्के अनुदानावर विद्युतपंप किंवा तेलपंप पुरवठा केला जातो. विद्युत पंप किंवा तेलपंपात काही किरकोळ जरी बिघाड झाला तरी त्या दुरुस्तीसाठी कुशल कारागिर आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन बरीच रक्कम घेतात व संबंधितांना लुबाडतात. त्यामुळे अशी प्रथा बंद करण्याच्या दृष्टीकोनातून आदिवासी बेरोजगारांना विद्युतपंप व तेलपंप दुरुस्तीचे जुजबी प्रशिक्षण देऊन त्यांना अत्यावश्यक अवजारे व हत्यारे यांचा पुरवठा करुन तात्पुरता मेकॅनिक तयार करण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

**वर्णन :-** धारणी तालुक्यातील वेगवेगळया गांवामधून किमान १० वी पास/नापास असलेल्या बेरोजगार आदिवासी युवकांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येते. अशा प्रशिक्षणार्थींची निवड करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी, यांना आहेत. सदर प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखलदरा/अमरावती यांचेमार्फत दिले जाते. सदर प्रशिक्षणार्थींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था या योजनेतून केली जाते. प्रशिक्षण देण्याऱ्या प्रशिक्षकांना रु.५००/- प्रमाणे मानधन देण्यात येते. प्रशिक्षणार्थींना येण्या-जाण्याचा खर्च या योजनेतून देतात. तसेच पॉकेट खर्च रु.५०/- प्रतिमाह प्रती विद्यार्थी देण्यात येतो. प्रशिक्षणार्थींना प्रकल्प

अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र समारंभपूर्वक दिले जाते. हया समारंभात आवश्यक असणारी हत्यारे व अवजारेसुध्दा हस्तांतरीत केली जातात.

या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी, प्रकल्प अधिकारी, धारणी असून वर्ष १९९३-९४ मध्ये या योजनेसाठी रु.१४,५००/- खर्च करण्यात आले.

*३.१.४ योजनेचे नांव — आदिवासी युवकांना वाहनचालकांचे प्रशिक्षण देणे.*
*(एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी)*

**उद्देश :-** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे अनुसूचित जमातीच्या वाहनचालकांचा मोठया प्रमाणावर अनुशेष भरावयाचा आहे. हा अनुशेष भरुन काढण्यासाठी महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून वाहनचालकांचे ३ महिन्यांचे प्रशिक्षण पांढरकवडा येथे आयोजित करण्यात येते. सदर प्रशिक्षणात प्रवेश मिळविण्यासाठी जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक आहे. परंतू हलके वाहन चालविण्याचा परवाना असल्याशिवाय जड वाहन चालविण्याचा परवाना आर.टी.ओ.कडून मिळत नाही. त्यामुळे हया योजनेच्या माध्यमातून आदिवासी उमेदवारांना हलके वाहन चालविण्याचा परवाना मिळचून देण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

**वर्णन:-** जे आदिवासी तरुण बेरोजगार आहेत व किमान ८ वी पास आहेत आणि इच्छुक आहेत. अशा आदिवासी तरुणांकडून अर्ज मागविण्यात येतात. आलेल्या अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करण्यात येते. निवड करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी. यांना आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना सरकारमान्य संस्थेकडे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. प्रशिक्षण संस्थेला द्यावयाची पूर्ण कोर्स फी, प्रवेश फी, प्रमाणपत्र, उमेदवारांचे फोटो इ.सर्व खर्च या योजनेतून केला जातो. प्रशिक्षणाच्या शेवटी परवाना प्राप्त केलेल्या उमेदवारांना निरोप समारंभ आयोजित करुन वाहन चालकाचा परवाना हस्तांतरीत केला जातो.

या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी असून १९९२-९३ या वर्षात या योजनेसाठी रु.५० हजार खर्च करण्यात आला.

*३.१.५ योजनेचे नांव — टंकलेखन प्रशिक्षण आयोजित करणे (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक)*

**उद्देश :-** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, उपयोजना क्षेत्रातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर त्यांना टंकलेखन प्रशिक्षण दिल्यास नोकरीची संधी उपलब्ध होण्यास मदत मिळेल, या हेतूने प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आवश्यक त्या ठिकाणी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्याचा असतो. रोज एक तास घेऊन सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करावयाचे असते.

*अटी व शर्ती*

१. प्रशिक्षणार्थींची हजेरी ८० टक्के किंवा त्यातून जास्त असेल तरच शिकवणी फी अनुज्ञेय राहील.
२. या अगोदर टंकलेखनाचे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींची पुन्हा निवड करता येणार नाही.
३. प्रशिक्षण शासनमान्य संस्थेमार्फत देण्यात यावे.
४. प्रशिक्षणार्थींची प्रगती समाधानकारक असावी.
५. उमेदवाराला मराठी व इंग्रजीचे प्रशिक्षण आवडीनुसार दिले जाईल व फी चा दर दोन्ही भाषेच्या प्रशिक्षणासाठी सारखाच राहील.
६. मराठी व इंग्रजी यापैकी कोणत्याही एका प्रकारचे प्रशिक्षण झालेल्या उमेदवाराला दुसऱ्या भाषेचे प्रशिक्षण घेता येईल

उपरोक्त ६ अटींचा समावेश संबंधित करारनामा करतांना करावा लागतो.

अंमलबजावणी अधिकारी : प्रकल्प अधिकारी. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

*३.१.६ योजनेचे नांव* *<u>आदिवासी तरुणांना वाहकांचे (कंडक्टर) प्रशिक्षण</u>*

उद्देश :- अनुसूचित जमातीचा नोकरीमधील अनुशेष भरुन काढण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदर योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळात कंडक्टर पदाचा मोठया प्रमाणात अनुशेष आहे. त्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध होत नाहीत. तेव्हा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना कंडक्टर प्रशिक्षण दिल्यास त्यांना नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकेल.

*<u>अटी व शर्ती</u>* १. प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी ८० टक्के किंवा त्याहून जास्त असेल तरच प्रशिक्षण फी अनुज्ञेय राहील.

२. प्रशिक्षण शासनमान्य संस्थेमार्फत देण्यात यावे.

३. प्रशिक्षणार्थींची प्रगती समाधानकारक असावी.

४. प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता केंद्रीय मोटार वाहन कायदा १९८८ नुसार असावी

उपरोक्त ४ अटींचा समावेश संस्थेशी केलेल्या करारनाम्यात असावा.

*३.१.७ योजनेचे नांव :-* *<u>आदिवासी विद्यार्थ्यांमधून नैपुण्यवान वा दर्जेदार खेळाडूंची निवड करण्यासाठी आश्रमशाळा स्तरावर क्रीडा शिबिरांचे आयोजन करणे.</u> (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली)*

उद्देश :- भारत सरकारव्दारे महाराष्ट्रामध्ये ५ विशेष क्रीडा प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येत असून केंद्रामध्ये प्रवेशाकरिता विशिष्ट निवड चाचणी आहे. या निवड चाचणीमध्ये गडचिरोली जिल्हयातील जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने नैपुण्यवान वा दर्जेदार खेळांडूंचे संशोधनासाठी आश्रमशाळा स्तरांवर शिबिराचे आयोजन करण्यात येते.

स्वरुप :- बहुतांश आदिवासी विद्यार्थ्यांची शरीरयष्टी सुदृढ व मेहनती असून उत्कृष्ट खेळाडूंचा सुप्त गुण आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये जपलेला आहे. परंतु उत्कृष्ट वा दर्जेदार खेळाडू होण्याच्या दृष्टीने प्राथमिक ज्ञान नसल्यामुळे आज क्रीडा क्षेत्रात तो मागे आहे. म्हणून आदिवासी विद्यार्थ्यांना प्रत्येक शिक्षण क्षेत्रात प्रोत्साहित करण्यासाठी व प्रगतीची उंची गाठण्यासाठी आश्रमशाळा स्तरावर आदिवासी विद्यार्थ्यांमधून दर्जेदार खेळाडूचे संशोधनासाठी शिबिराचे आयोजन करण्यात येते.

याकरिता आश्रमशाळा स्तरांवर १० दिवसांचे क्रीडा शिबिरांचे आयोजन करण्यात येऊन शिबिराकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी, गडचिरोली यांचेकडून ४ प्रशिक्षक नेमण्यात येतात. सकाळी ६ ते ८ व सायंकाळी ५-३० ते ६-३० या वेळेत इतर विषयाचे तास सोडून १० दिवस वर्ग घेण्यात येतात. सदर शिबिरासाठी ८ ते १४ वयोगटातील मुला-मुलींचे वय, उंची व वजन या तीन बाबी विचारात घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. प्रशिक्षकाची निवास व भोजन व्यवस्था आश्रमशाळांवर करण्यात येते. प्रशिक्षकास प्रत्येकी ४०० रु.मानधन देण्यात येते. जिल्हा क्रीडा अधिकारी,गडचिरोली हे सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी आहेत.

*३.१.८ योजनेचे नांव* ***<u>आदिवासी मेळाव्याचे आयोजन करुन आदिवासी कुटुबांना जनता साडी व धोतर वाटप करणे</u>***

**उद्देश :-** आदिवासी मेळावा आयोजित करुन त्यांच्यासाठी शासन राबवित असलेल्या योजनांची माहिती देणे व त्यांना योजनांचा लाभ घेण्यास प्रवृत्त करुन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे

**स्वरुप :-** प्रकल्प अधिकारी, एकात्मिकआदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचे कार्यक्षेत्रातील खेडया-पाडयातील व अति दुर्गम भागातील आदिवासींना एकत्रित बोलावून आदिवासी मेळांव्याचे आयोजन करुन त्यामध्ये मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास,नागपूर , मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद. गडचिरोली व अन्य जाणकार व्यक्तींना निमंत्रित करुन आदिवासींना मार्गदर्शन केले जाते. त्याचप्रमाणे आदिवासी कुटुबांना जनता साडी व धोतरांचे संच वाटप केले जाते. त्यासाठी प्रत्येक लाभधारकामागे ५२/- रु. खर्च येतो. वर्ष १९९३-९४ मध्ये अशा २४०० कुटुबांना जनता साडी व धोतरांचे संच वाटप करण्यात आले.

*३.१.९ योजनेचे नांव -* ***<u>शाळा/महाविद्यालयात पायदळ शिक्षण घेणाऱ्या खेडयातील आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींना ५० टक्के अनुदानावर सायकल व दोन बँड रेडिओंचा पुरवठा करणे</u>***

**उद्‌देश :-** बाहेरगांवी पायी जाऊन शिक्षण घेणाऱ्या खेडयातील आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींना शाळा/महाविद्यालयात नियमित वेळेवर पोहोचण्याच्या दृष्टीने तसेच एस.टी. प्रवास भाडे खर्चाचा भुर्दंड पडू नये, हा या योजनेचा मुख्य उद्‌देश आहे. तसेच रेडिओ हे अनौपचारिक शिक्षणाचे उत्तम माध्यम असल्याने त्यामार्फत आदिवासी समाजामध्ये अनौपचारिक शिक्षण देण्याचे उदिष्ट साध्य होऊ शकेल.

**स्वरुप :-** शाळा महाविद्यालयाचे शैक्षणिक सत्र सुरु होताच आदिवासी विद्यार्थी शासनाने उपलब्ध केलेल्या विनामूल्य शैक्षणिक सुविधांचा लाभ घेण्यासाठी धडपड करतो. मुख्यत: शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे वसतीगृहाचे प्रवेशापासून वंचित झाल्यास नाईलाजाने बाहेरगांवी पायी जाऊन किंवा एस.टी.प्रवासाद्वारे शिक्षण घेणे भाग पडते. आदिवासी विद्यार्थ्यांची आर्थिक बाजू कमजोर असून सुध्दा अशा परिस्थितीत प्रवासाकरिता येण्या-जाण्याचा आर्थिक भुर्दंड विद्यार्थ्यास सोसावा लागतो. यासाटी ही योजना प्रस्तावित करण्यात आली असून गडचिरोली, आरमोरी, धानोरा, वडसा, कुरखेडा व कोरची या तालुक्यातील खेडयात राहणारे आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींना ५० टक्के अनुदानावर सायकल व २ बँड रेडिओ पुरविण्यात येतो. या योजनेचा लाभ देतांना प्रत्यक्षात विद्यार्थी बाहेरगांवी पायी जाऊन शिक्षण घेत असल्याबाबत मुख्याध्यापक/प्राचार्य किंवा सरपंच यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची पाहणी करुनच या योजनेचा लाभ देण्यात येतो. यामध्ये सायकलीची किंमत रुपये १२००/- तसेच रेडिओची किंमत रु.७००/- प्रस्तावित केली असून त्यापैकी ५० टक्के रक्कम विद्यार्थ्याने भरावयाची असते. या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आदिवासी साक्षरता मेळाव्यात सक्रीय सहभाग घेऊन साक्षरता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली असून वर्षे १९९३-९४ मध्ये या योजनेचा लाभ १०० विद्यार्थ्यांना देण्यात आला.

३.१.१०. योजनेचे नांव :- *__शासकीय आश्रमशाळाना ग्रंथालयीन पुस्तकांचा पुरवठा करणे__ (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली)*

**उद्दिष्टय :-** आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामान्य ज्ञान, कथा, कादंबरी, मनोरंजक गोष्टी, ऐतिहासिक, पौराणिक, सांस्कृतिक इ. मराठी, हिंदी व इंग्रजी गंथालयीन पुस्तकांचा पुरवठा करुन विद्यार्थ्यामध्ये पुस्तके वाचण्याची आवड तसेच चिकाटी निर्माण करुन बुध्दिमत्तेत वाढ करणे व सुसंस्कृत नागरिक बनविणे हे या योजनेच उदिष्टय आहे.

**स्वरुप :-** मुख्यत: आदिवासी विद्यार्थी हा दुर्गम भागात राहत असल्यामुळे शहरी विभागाचे मानाने शिक्षण क्षेत्रात मागे आहे. शासनाने दिलेल्या सुविधेमुळे बऱ्याच प्रमाणात आदिवासी विद्यार्थी शिक्षण क्षेत्राकडे वळत आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना पुस्तके वाचण्याची गोडी लागावी व त्याद्वारे त्यांच्या बुध्दीमत्तेचा विकास व्हावा तसेच त्यांना कला मनोरंजन, साहित्य, विचार, ग्रंथालयीन पुस्तकांतून मिळावेत आणि शिक्षण क्षेत्रात प्रगतीची वाटचाल करुन सुसंस्कृत नागरिक बनावा यासाठी शासकीय आश्रमशाळांना ग्रंथालयीन पुस्तकांचा पुरवठा करणे यासाठी ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली असून वर्षे, १९९३-९४ मध्ये या योजनेसाठी रु.४ लाख६ हजार खर्च करण्यात आले असून प्रकल्पातील एकूण १९ आश्रमशाळांना ग्रंथालयीन पुस्तके पुरविण्यात आली आहेत.

३.१.११. योजनेचे नांव :- *__शासकीय आश्रमशाळांना व वसतीगृहात रंगीत टी.व्ही.संच पुरविणे__* (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली)

**उदिष्टय :-** शासकीय आश्रमशाळातील व वसतीगृहातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, कला व साहित्य विषयक आणि दैनंदिन ताज्या राष्ट्रीय व जागतिक घटनांचे ज्ञान टी.व्ही.व्दारे प्राप्त व्हावे व त्यामुळे त्यांना परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करता येईल, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्टय आहे.

**स्वरुप :-** अति दुर्गम व डोंगराळ विभागात शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी इतर समाजाच्या मानाने मागास आणि आर्थिक परिस्थितीने कमकुवत असल्यामुळे टी.व्ही.संचासारखी महागडी वस्तु खरेदी करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे टी.व्ही.प्रसार माध्यमाव्दारे मिळणारे शैक्षणिक, कला व साहित्यविषयक ज्ञानापासून वंचित आहे. यासाठी शासकीय आश्रमशाळा स्तरावर टी.व्ही.संच पुरवून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरच्या दैंनदिन घटना, शैक्षणिक , कला, साहित्य इ.ज्ञान टी.व्ही.व्दारे आदिवासी विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे म्हणून ही योजना राबविण्यात आली. या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली हे असून वर्ष १९९३-९४ मध्ये १४ आश्रमशाळांना संच पुरविण्यात आले व त्यासाठी रु.१,५६,५२६/- इतका खर्च आला.

*३.१.१२. योजनेचे नांव :-* ***<u>नक्षलवादी क्षेत्रातील लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे</u>** :- (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली)*

**उद्देश :-** निरक्षरता,अज्ञान व दारिद्रय यामुळे गडचिरोली, धानोरा, वडसा, कोरची, कुरखेडा व आरमोरी तालुक्यातील दुर्गम गांवातील आदिवासी युवक नक्षलवाद्यांच्या प्रचाराला बळी पडून नक्षलवादी प्रभावाखाली येऊ लागले आहेत. अशापैकी शरण आलेल्या आदिवासी युवकांचे सामाजिक व आर्थिक पुनवर्सन करण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

**स्वरुप :-** नक्षलवादी कारवाया सोडून देण्याची इच्छा असणाऱ्या आदिवासी युवकांचे सामाजिक व आर्थिक पुनवर्सन दुसऱ्या भागात करता यावे यासाठी पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेमार्फत ही योजना राबवण्यात येत असून अशा युवकांची नांवे पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येतात. या योजनेअंतर्गत वर्ष १९९३-९४ मध्ये १.२९ लाख रुपये खर्च करण्यात आला.

*३.१.१३. योजनेचे नांव:-* ***<u>सीमीत परिवार योजना</u>** :- (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली)*

**उद्देश :-** प्रकल्प क्षेत्रातील आदिवासी महिलांना कुटुब नियोजनाचे महत्व पटवून देणे व आकर्षक आर्थिक लाभ देऊन कुटुंब मर्यादित ठेवण्यास प्रवृत्त करणे व त्याव्दारे लोकसंख्या वाढीचा वेग कमी करण्याचा प्रयत्न करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**स्वरुप :-** या योजनेचा कालावधी वर्ष १९९३-९४ ते २०१६ ठेवण्यात आला आहे.

*<u>पात्रता:</u>-* १६ ते २२ या वयोगटातील विवाहीत किंवा अविवाहीत महिला या योजनेसाठी पात्र असून ती जर विवाहीत असेल तर तिला अपत्य नसले पाहिजे. तसेच तिने वयाची २२ वर्षे पूर्ण होईपर्यंत मूल होऊ देता कामा नये. त्याचप्रमाणे त्यानंतर संपूर्ण आयुष्यात आपण दोनपेक्षा जास्त अपत्ये होऊ देणार नाही, अशी हमी तिने दिली पाहिजे. अशा जोडप्यास कुटुंब नियोजनाची साधने वापरण्यास प्रवृत्त करण्यात येते. तसेच अपवादात्मक परिस्थितीत नको असलेल्या तीन महिन्यापर्यंतचा गर्भ काढून टाकण्यास मदत केली जाते.

ज्या आदिवासी महिलेचे वय २२ वर्षापेक्षा जास्त आहे, परंतू जिला दोनपेक्षा जास्त अपत्ये नाहीत अशा महिलेला देखील या योजनेचा लाभ देता येईल, मात्र पहिले अपत्य हे तिच्या वयाची २२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झालेले नसले पाहिजे. तसेच एखादे अपत्य जर दत्तक म्हणून दिले असेल तर योजनेचा लाभ देताना असे अपत्य ज्या मातेने त्याला जन्म दिला तिचे आहे, असे समजण्यात येईल.

वरील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या जोडप्यास २६ जानेवारी २०१६ रु.८०,०००/- मा.प्रकल्प अधिकारी, यांचेमार्फत समारंभपूर्वक देण्यात येईल. या जोडप्याने वरील रक्कम आपल्या मुलांचे विवाह/उच्च शिक्षण/व्यवसाय यासाठी खर्च करावेत,असा हेतू त्यामागे आहे.

प्रकल्प कार्यालय, गडचिरोली यांचेमार्फत या योजनेसाठी प्रत्येक जोडप्यासाठी एकाचवेळी रु.५,०००/- इंदिरा विकास पत्र किंवा किसान विकास पत्रात गुंतविण्यात आले असून या योजनेचा कालावधी २२ वर्षाचा असल्याने इ.स.२०१६ साली या रु.५०००/- चे रु.८०,०००/- होतील. कारण इंदिरा विकास पत्र किंवा किसान विकास पत्रात साडे पाच वर्षात गुंतविलेली रक्कम दुप्पट होते.

लाभार्थीने या योजनेचा लाभ घेण्यापूर्वी आपल्या जन्माचा दाखला तसेच दोनपेक्षा जास्त अपत्ये होऊ देणार नाही असे हमीपत्र प्रकल्प अधिकारी, यांना सादर केले पाहिजे. अशा जोडप्यांना कुटुंब नियोजनविषयक सर्व सुविधा नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पुरविण्यात येतात. त्याचप्रमाणे दरवर्षी ३१ डिसेंबर रोजी वैद्यकिय अधिकारी यांनी स्थिती अहवाल (Status Report ) प्रकल्प अधिकाऱ्यांना सादर करावयाचा असतो.

वरील योजनेत समाविष्ट झालेल्या आदिवासी महिलेस जर वयाची २२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी अपत्ये झाले किंवा नंतर तीन अपत्ये झाली तर ते जोडपे या लाभापासून वंचित होते. तसेच त्यांच्यासाठी गुंतवलेली रक्कम शासनास परत करण्यात येते.

या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली तसेच संबंधित क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी आहेत. वर्ष १९९३-९४ मध्ये प्रकल्प क्षेत्रातील ४० आदिवासी महिला या योजनेत समाविष्ट झाल्या असून त्यासाठी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

*३.१.१४. योजनेचे नांवः-* *<u>औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे</u> (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली)*

**उदिष्ट :-** प्रकल्प क्षेत्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता ज्या उमेदवारांची पहिल्या व दुसऱ्या सत्राकरिता निवड झालेली आहे व ज्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था कोणत्याही शासकीय वसतीगृहात झालेली नाही, अशा आदिवासी उमेदवारांना त्यांचे प्रशिक्षण पूर्ण होण्याकरिता आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**स्वरुप :-** गडचिरोली जिल्हयामध्ये उपयोजना क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या गडचिरोली व वडसा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ज्या उमेदवारांची विविध व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता पहिल्या व दुसऱ्या सत्राकरिता निवड झालेली आहे, अशा प्रशिक्षणार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र व प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी प्रमाणित केलेले उपस्थिती प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच त्यांना दरमहा रु.२४०/- प्रमाणे उपस्थितीनुसार निर्वाह भत्ता प्रदान करण्यात येतो.

ज्या विद्यार्थ्यांनी सन १९९२-९३ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतलेला आहे आणि ते १९९३-९४ या वर्षात व्दितीय सत्रात प्रशिक्षण घेत आहेत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी १९९३-९४ या वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतला आहे अशा प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

मा.प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली हे या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असून वर्ष १९९३-९४ मध्ये या योजनेसाठी रु.६६,०८२/- खर्च करण्यात आले. परंतू वर्ष १९९३-९४ मध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यास प्रस्ताव केला असता ही योजना नामंजूर करण्यात आली व तेव्हापासून बंद पडली.

वरील योजनांसह केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत राज्यात ज्या विविध योजना राबविण्यात येतात, त्याची एक सूची तयार करण्यात आली असून ती परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

## प्रकरण ४ थे

### मूल्यमापन अहवालाचा उद्‌देश व सर्व्हेक्षण पध्दती

४.१ केंद्रचर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविलेल्या योजनांचा मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करतांना खालील उदिष्टये ठरविण्यात आली आहेत.

१. क्रेंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांचे स्वरुप व आदिवासी लाभार्थीवरील त्यांचा प्रभाव तपासणे.

२. केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविलेलया योजनांतील त्रुटी/अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी समजावून घेण.

३. केंद्रवर्ती अर्थसंकल्पातंर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची फलश्रुती तपासणे.

४.२ वरील उद्देशांच्या पूर्ततेसाठी प्रकल्प अधिकारी तसेच आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. सन १९९२-९३ व १९९३-९४ ही आधारभूत वर्षे मानून राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच क्षेत्राबाहेर केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेलया सर्व योजनांविषयी माहिती मागविण्यात आली.

४.३ या सांख्यिकी माहितीच्या आधारे व संस्थेकडील सर्व्हेक्षणाच्या कामी उपलब्ध होणारा कर्मचारीवृंद तसेच सर्व्हेक्षणासाठी लागणारा कालावधी विचारात घेऊन ठराविक क्षेत्रातच सर्व्हेक्षण करण्याचे ठरविण्यात आले.

४.४ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सहयाद्री विभागातून एक व गोंडवन विभागातून दोन अशा तीन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची निवड त्यासाठी करण्यात आली. ज्या प्रकल्पांमध्ये अधिकाधिक योजना राबविण्यात आल्या आहेत, त्यांचा प्रामुख्याने या पाहणीत समावेश करण्याचे ठरले. त्याचबरोबर लाभार्थींची संख्या विचारात घेऊन अधिकाधिक लाभार्थींची संख्या असलेल्या प्रकल्पांची निवड कायम करण्यात आली. या निकषानुसार सहयाद्री विभागातून नाशिक व गोंडवन विभागातून धारणी व गडचिरोली प्रकल्पांची पाहणीसाठी निवड करण्यात आली.

४.५ प्रत्येक जिल्हयातून कमीत कमी एक तालुका निवडण्याचे ठरले. तालुक्याची निवड करतांना ज्या तालुकयात अधिकाधिक योजना राबविल्या गेल्या आहेत, त्याचांच प्रामुख्याने विचार करण्याचे ठरले. मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक तसेच प्रकल्प अधिकारी यांनी पाठविलेलया सांख्यिकी माहितीवरुन तसेच त्यांच्याशी चर्चा करुन तालुक्यांची पाहणीसाठी निवड करण्यात आली. त्यानुसार नाशिक जिल्हयातील इगतपूरी तालुका व अमरावती जिल्हयातील धारणी तालुका व गडचिरोली जिल्हयातील चार तालुक्यांची निवड करण्यात आली.

४.६ गावांच्या निवडीसंबंधी काही निकष ठरविण्यात आले.जास्त योजनांचा फायदा देण्यात आलेली गांवे, त्यात रस्त्यालगतची व दुर्गम भागातील गांवे यांचा समावेश करण्याचे ठरले. त्यानुसार रस्त्यालगतचे एक गांव,रस्त्यापासून थोडया अंतरावरील एक गांव व दुर्गम भागातील एक गांव अशाप्रकारे गांवाची निवड करण्याचे ठरले.

४.७ निवड केलेल्या लाभार्थींची माहिती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावली/प्रपत्र (Schedule) तयार करण्यात आले. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे योजनेसंबंधी अभिप्राय नोंदविण्यासाठी देखील एक प्रपत्र तयार करण्यात आले. अशाप्रकारे निवडलेल्या ३ जिल्हयातील ६ तालुक्यातून ८४ लाभार्थींना समक्ष भेट देऊन विहित प्रपत्रात माहिती संकलित करण्यात

आली. त्याचप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशी समक्ष चर्चा करुन नाशिक/अमरावती/गडचिरोली जिल्हयातून योजना राबविण्याऱ्या यंत्रणाची माहिती तीन विहित प्रपत्रात संकलित करण्यात आली.

सारांश, जिल्हा/तालुका/गांव व लाभार्थी निवडीचे स्वरुप खालील तक्त्यांव्दारे दिग्दर्शित केले आहे.

**तक्ता क.४.१**

**जिल्हा/तालुका/गांव/लाभार्थी निवड दर्शविणारा तक्ता**

| अ.क. | जिल्हा | तालुक्यांची संख्या | निवडलेल्या | |
|---|---|---|---|---|
| | | | गांवाची संख्या | लाभार्थी संख्या |
| १. | गडचिरोली | ४ | ११ | ३२ |
| २. | अमरावती | १ | ७ | २९ |
| ३. | नाशिक | १ | ३ | २३ |
| **एकूण** | | ६ | २१ | ८४ |

४.८ सर्व्हेक्षण पाहणीतील ८४ लाभार्थीकडून संकलित केलेल्या माहितीचेपृथ:करण व तक्तीकरण करण्यात आले. यातून निघालेल्या निष्कर्षाचा सांगोपांग विचार पुढील प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांच्याही विचारांची सांगड योग्य ठिकाणी घालण्यात आली आहे. या अहवालातील निष्कर्ष व शिफारशी मुखत्वे क्षेत्रीय पाहणीवरच आधारलेल्या आहेत.

# प्रकरण ५ वे

## क्षेत्रीय पाहणीतील निष्कर्ष तसेच सूचना तथा शिफारशी

५.१ केंद्रीय अर्थसंकल्पांतर्गत मोठया प्रमाणावर राबविल्या गेलेल्या खालील योजनांची प्रामुख्याने निवड करुन मूल्यमापन केले असून त्यामध्ये खालील योजनांचा अंतर्भाव आहे.

१. आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सिंचनाकरिता पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा करणे.

२. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी महिलांना ५० टक्के अनुदानावर शिलाई यंत्र देणे.

३. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण देण्याची योजना

४. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी टंकलेखन प्रशिक्षण देण्याची योजना.

५. आदिवासी युवकांना वाहनचालकांचे प्रशिक्षण योजना.

६. आदिवासी तरुणांना वाहकाचे प्रशिक्षण देणे.

७. आदिवासी तरुणांना तेल इंजिन व विद्युत पंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे.

८. आदिवासी युवकांना सैन्य/पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण देणे.

९. आदिवासी युवक युवतींच्या सामूहिक विवाहाकरिता अर्थसहाय्य करणे.

१०. आदिवासी मेळाव्याचे आयोजन करुन आदिवासी कुटुबांना जनतासाडी व धोतर संचाचे वाटप करणे.

११. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना अर्थसहाय्य करणे.

१२. आदिवासी सुशिक्षित युवकांना सायकल/रेडिओचा ५० टक्के अनुदानावर पुरवठा करणे.

१३. आदिवासींच्या घरांना वीज पॉईंट फिटींग करणे.

५.२ वरील योजनांसाठी गडचिरोली, अमरावती, तसेच नाशिक जिल्हयातील सहा तालुक्यांची निवड करण्यात आली व एक नमुना पाहणी आयोजित करण्यात आली. मूल्यमापन पाहणी संदर्भात लाभार्थींकडून मूल्यमापन पाहणीच्या उद्‌देशाबाबत सर्वांगीण माहिती गोळा करता यावी अशादृष्टीने एक प्रपत्र/पत्रक तयार करुन एकूण ८४ लाभार्थींकडून माहिती संकलित करण्यात आली. याशिवाय योजना अंमलबजावणी अधिकाऱ्यांचे अभिप्राय, सूचना व अडचणी वेगळया प्रपत्रात संकलित करण्यात आल्या. वर नमूद केलेल्या माहितीचे पृथ:करण करण्यात आले. ही माहिती तक्ता क्र. ५.१ ते ५.७ मध्ये देण्यात आली आहे.

तक्ता क्र ५.१

निवडलेल्या लाभार्थींची जिल्हावार व तहसिलवार जमातीनुसार वर्गवारी दर्शविणारा तक्ता

| अ.क. | जिल्हा | तहसिल | एकूण लाभार्थी संख्या | निवडलेल्या लाभार्थींची जमातीनुसार वर्गवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गोंड | हलबा | कोरकू | महादेव कोळी | कोकणा | ठाकूर |
| १. | गडचिरोली | वडसा | १० | ६ | ४ | - | - | - | - |
| | | कुरखेडा | १२ | १२ | - | - | - | - | - |
| | | धानोरा | ६ | ६ | - | - | - | - | - |
| | | कोरची | ४ | ४ | - | - | - | - | - |
| २. | अमरावती | धारणी | २९ | ६ | - | २३ | - | - | - |
| ३. | नाशिक | इगतपूरी | २३ | - | - | - | २१ | १ | १ |
| एकूण | | | ८४ | ३४ | ४ | २३ | २१ | १ | १ |

वरील तक्त्यांचे अवलोकन केले असता असे दिसते की, गडचिरोली जिल्हयातील लाभार्थी मुख्यत्वे गोंड व हलबा जमातीचे असून अमरावती जिल्हयातील लाभार्थी हे मुख्यत्वे कोरकू आहेत. त्याचप्रमाणे नाशिक जिल्हयातील लाभार्थी महादेव कोळी जमातीचे आहेत.

तक्ता ५.२

निवडलेल्या लाभार्थ्यांच्या कुटुंबातील साक्षर निरक्षरतेची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ.क. | जिल्हा | तहसिल | एकूण लाभार्थी कुटुंब संख्या | साक्षर | | निरक्षर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | महिला | पुरुष | महिला |
| १. | गडचिरोली | वडसा | १० | ७ | ८ | २४ | २४ |
| | | कुरखेडा | १२ | १५ | १२ | ३४ | ३० |
| | | धानोरा | ६ | ४ | ४ | १६ | १३ |
| | | कोरची | ४ | ३ | ४ | ११ | ११ |
| २. | अमरावती | धारणी | २९ | २३ | १९ | ७५ | ६५ |
| ३. | नाशिक | इगतपूरी | २३ | २४ | १८ | ४४ | ४३ |
| एकूण | | | ८४ | ७६ | ६५ | २०४ | १८६ |

वरील तक्त्यांचे विश्लेषण केले असता असे आढळते की निवडलेल्या ८४ कुटुंबात पुरुष साक्षरतेचे प्रमाण २७.१४ टक्के असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण २५.८९ टक्के आहे. सर्वसाधारण साक्षरतेचा विचार केला असता हे प्रमाण २६.५५ टक्के इतके आढळते.त्यामुळे आदिवासींमधील निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. कारण पाहणीसाठी निवडलेल्या कुटुंबात पुरुष निरक्षरतेचे प्रमाण ७२.८६ टक्के आढळले. तसेच स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण ७४.११ टक्के आढळले.

योजनानिहाय तसेच जिल्हा/तालुका निहाय भरलेल्या लाभार्थींच्या प्रपत्रांची संख्या दर्शविणारी माहिती पुढे तक्ता क.५.३ मध्ये विषद केलेली आहे.

तक्ता क.५.३

**केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत योजनांच्या वर्गवारीनुसार निवडलेल्या लाभधारकांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | योजनेची वर्गवारी व योजनांचीं नांवे | जिल्हा | तालुका | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | अ. उत्पन्न निर्मिती किंवा वाढीच्या योजना | | | २० |
| | १.आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सिंचनाकरिता पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा करणे | अमरावती<br>नाशिक | धारणी<br>इगतपूरी | ४<br>४ |
| | २. शिवणकला प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी महिलांना ५० टक्के अनुदानावर शिलाई यंत्र देणे | अमरावती<br>नाशिक | धारणी<br>इगतपूरी | ५<br>७ |
| २. | (ब) प्रशिक्षण योजना | | | ३० |
| | १. आदिवासी युवकांना सैन्य/पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ३ |
| | २. आदिवासी तरुणांना तेल इंजिन व विद्युतपंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ९ |
| | ३. आदिवासी युवकांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ६ |
| | ४. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण देण्याची योजना | नाशिक | इगतपूरी | २ |
| | ५. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी टंकलेखन प्रशिक्षण आयोजित करणे | नाशिक | इगतपूरी | ९ |
| | ६. आदिवासी तरुणांना वाहकाचे प्रशिक्षण देणे | नाशिक | इगतपूरी | १ |
| ३. | (क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना | | | ३२ |
| | १. आदिवासी युवक-युवतीच्या सामुहिक विवाहाकरिता अर्थसहाय्य करणे | गडचिरोली | कुरखेडा<br>धानोरा | १२<br>१ |
| | २. आदिवासी मेळाव्याचे आयोजन करुन आदिवासी कुटुबांना जनता साडी व धोतर संचाचे वाटप करणे | गडचिरोली | धानोरा | ५ |
| | ३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना अर्थसहाय्य करणे | गडचिरोली | वडसा | १० |
| | ४.आदिवासी सुशिक्षित युवकांना सायकल/रेडिओचा पुरवठा करणे | गडचिरोली | कोरची | ४ |
| ४. | (ड) आदिवासींच्या कल्याणाच्या योजना | | | २ |
| | १. आदिवासींच्या घरांना वीज पॉईंट फिटींग करणे | अमरावती | धारणी | २ |
| **एकूण लाभार्थी संख्या** | | | | ८४ |

निवडलेल्या ८४ लाभार्थ्यांपैकी २० लाभार्थ्यांनी उत्पन्न निर्मितीच्या योजना, ३० लाभार्थींनी प्रशिक्षणाच्या योजना, ३२ लाभार्थ्यांनी मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना आणि २ लाभार्थ्यांनी कल्याणात्मक योजनांचा लाभ घेतल्याचे दिसून येते.

### तक्ता क.५.४

### जिल्हावार व तालुकावार निवडलेल्या लाभार्थींची जमीनधारणा दर्शविणारा तक्ता

| अ.क. | जिल्हा | तहसिल | जंमीन धारणेनुसार लाभार्थींची वर्गवारी | | | | | | एकूण लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २.५० एकरपर्यंत | २.५१ ते ५.०० एकर | ५.०१ ते १०.०० एकर | १०.०१ च्या पुढे | एकूण | भूमीहीन लाभार्थी | |
| १. | गडचिरोली | वडसा | - | १ | ५ | २ | ८ | २ | १० |
| | | कुरखेडा | - | २ | ५ | २ | ९ | ३ | १२ |
| | | धानोरा | - | ४ | १ | १ | ६ | - | ६ |
| | | कोरची | - | २ | १ | १ | ४ | - | ४ |
| २. | अमरावती | धारणी | २ | ७ | १० | ३ | २२ | ७ | २९ |
| ३. | नाशिक | इगतपूरी | २ | ९ | ७ | २ | २० | ३ | २३ |
| एकूण | | | ४ | २५ | २९ | ११ | ६९ | १५ | ८४ |

निवडलेल्या लाभार्थी कुटुंबांचा विचार केला असता ८४, पैकी १५ कुटुबे भूमिहिन आढळली. त्याचप्रमाणे जमीन धारणा असणाऱ्या कुटुबांचा विचार केला असता असे आढळले की, ८४ टक्के कुटुंबांची जमीनधारणा १० एकरापर्यंत असून त्यापेक्षा जास्त जमीनधारणा असणाऱ्या कुटुबांची टक्केवारी १६ इतकी येते. यावरुन असे आढळते की, भूमिहिन तसेच अल्प जमीनधारणा असणाऱ्या कुटुबांचा योजनांमधील सहभाग चांगला आहे.

### तक्ता क.५.५

### निवडलेल्या लाभार्थींची उत्पन्नाच्या आकारमानाप्रमाणे तालुकानिहाय संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क. | उत्पन्नाचे आकारमान रुपये | गडचिरोली | | | | अमरावती | नाशिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वडसा | कुरखेडा | धानोरा | कोरची | धारणी | इगतपूरी | |
| १. | १ ते ५०० | - | - | - | - | - | - | - |
| २. | ५०१ ते १००० | - | - | - | - | - | - | - |
| ३. | १००१ ते २००० | - | - | - | - | - | - | - |
| ४. | २००१ ते ३५०० | - | - | - | १ | ३ | ५ | ९ |
| ५. | ३५०१ ते ५००० | २ | - | २ | - | १४ | ८ | २६ |
| ६. | ५००१ ते १०००० | ८ | १० | ३ | २ | ११ | ७ | ४१ |
| ७. | १०००१ ते १५००० | - | २ | - | १ | - | - | ३ |
| ८. | १५००० पंक्षा जास्त | - | - | १ | - | १ | ३ | ५ |
| एकूण | | १० | १२ | ६ | ४ | २९ | २३ | ८४ |

आदिवासी लाभार्थी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार केला असता असे दिसून आले की, दहा हजार रुपयापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुबांची टक्केवारी ९० इतकी आहे, तर १५००० रुपयापेक्षा जास्त उत्पन्न असणारी फक्त ५ कुटुबे आढळली. त्याची टक्केवारी १० इतकी आहे.

निवडलेल्या लाभार्थी कुटुंबाकडे असलेल्या पशुधनाबाबतची माहिती संकलित केली असून ती तक्ता क.५.६ मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता क.५.६

लाभार्थ्यांकडे असणारे एकूण पशुधन दर्शविणारा तक्ता

| अ. क. | जिल्हा | तहसिल | एकूण लाभार्थीसंख्या | लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गाई | बैल | म्हशी | रेडे | शेळया | कोंबडया |
| १. | गडचिरोली | वडसा | १० | ३ | ७ | - | - | १७ | ४२ |
| | | कुरखेडा | १२ | ११ | ६ | - | - | ८ | ७७ |
| | | धानोरा | ६ | ४ | ६ | - | - | २ | २० |
| | | कोरची | ४ | १ | २ | - | - | - | १३ |
| २. | अमरावती | धारणी | २९ | १० | ८ | ४ | - | ३४ | १०७ |
| ३. | नाशिक | इगतपूरी | २३ | ५ | ११ | ५ | २ | - | ५ |
| एकूण | | | ८४ | ३४ | ४० | ९ | २ | ६१ | २६४ |

गाई, बैल, कोंबड्या इ.पशुधन सर्व लाभार्थ्यांकडे असून त्या खालोखाल शेळ्या, म्हशी, रेडे, यांचा क्रम लागतो. पशुधन हे आदिवासी जीवनाचा अविभाज्य घटक असून त्यामुळे त्यांच्या वार्षिक उत्पन्नात भर पडण्यास मदत होते.

तक्ता क.५.७

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविलेलया योजनामुळे आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थींची संख्या व टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | योजनेची वर्गवारी व योजनांचीं नांवे | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थ्यांची संख्या | टक्के वारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (अ) उत्पन्न निर्मिती किंवा वाढीच्या योजना | | | २० | १५ | ७५ |
| | १.आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर सिंचनाकरिता पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा करणे | अमरावती<br>नाशिक | धारणी<br>इगतपूरी | ४<br>४ | ४<br>४ | १००<br>१०० |
| | २. शिवणकला प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आदिवासी महिलांना ५० टक्के अनुदानावर शिलाई यंत्र देणे | अमरावती<br>नाशिक | नाशिक<br>इगतपूरी | ५<br>७ | ३<br>४ | ६०<br>५७ |

| अ.क्र. | योजनेची वर्गवारी व योजनांची नांवे | जिल्हा | | तालुका | एकूण लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | (ब) प्रशिक्षण योजना | | | ३० | १२ | ४० |
| | १. आदिवासी युवकांना सैन्य/पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ३ | १ | ३३ |
| | २. आदिवासी तरुणांना तेल इंजिन व विद्युतपंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ९ | ५ | ५६ |
| | ३. आदिवासी युवकांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे | अमरावती | धारणी | ६ | ३ | ५० |
| | ४. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण देण्याची योजना | नाशिक | इगतपूरी | २ | - | - |
| | ५. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी टंकलेखन प्रशिक्षण आयोजित करणे | नाशिक | इगतपूरी | ९ | ३ | ३३ |
| | ६. आदिवासी तरुणांना वाहकाचे प्रशिक्षण देणे | नाशिक | इगतपूरी | १ | - | - |
| ३. | (क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना | | | ३२ | २८ | ८८ |
| | १. आदिवासी युवक-युवतीच्या सामुहिक विवाहाकरिता अर्थसहाय्य करणे | गडचिरोली | कुरखेडा<br>धानोरा | १२<br>१ | १२<br>१ | १००<br>१०० |
| | २. आदिवासी मेळाव्याचे आयोजन करुन आदिवासी कुटुबांना जनता साडी व धोतर संचाचे वाटप करणे | गडचिरोली | धानोरा | ५ | ५ | १०० |
| | ३. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना अर्थसहाय्य करणे | गडचिरोली | वडसा | १० | १० | १०० |
| | ४. आदिवासी सुशिक्षित युवकांना सायकल/रेडिओचा पुरवठा करणे | गडचिरोली | कोरची | ४ | - | - |
| ४. | (ड) आदिवासींच्या कल्याणाच्या योजना | | | २ | - | - |
| | १. आदिवासींच्या घरांना वीज पॉईंट फिटींग करणे | अमरावती | धारणी | २ | - | - |
| | **एकूण लाभार्थी संख्या** | | | ८४ | ५५ | - |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, योजनेचा लाभ घेतल्यामुळे झालेल्या आर्थिक लाभाचा विचार केला असता उत्पन्न निर्मितीच्या योजनामुळे ७५ टक्के, प्रशिक्षणात्मक योजनामुळे ४० टक्के व मानव साधनसंपत्ती विकासाच्या योजनामुळे ८८ टक्के लाभार्थींच्या उत्पन्नात भर पडल्याचे दिसून येते.

५.३ क्षेत्रीय पाहणी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे उपलब्ध झालेली माहिती, योजना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय त्याचप्रमाणे राज्यात वर्ष १९९३-९४ मध्ये विविध एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांनी केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविलेल्या योजनांवर झालेल्या खर्चाचे विश्लेषण केले असता इतर खालील मुद्दे आढळले.

५.३ .१ केंद्रीय अर्थसंकल्पांतर्गत आदिवासींच्या गरजांवर आधारीत अनेक महत्वाच्या योजना राज्यात राबविण्यात येत असून वर्ष १९९३-९४ मध्ये राबविण्यात आलेल्या विविध योजनांची सूची तपासली असता असे लक्षात येते की, संदर्भ वर्षात राज्यात १२९ योजना राबवण्यात आल्या. तसेच राज्यात या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या ३७,६३४ होती.

या योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, वर्ष १९९३-९४ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत योजना राबविण्यासाठी जवळ जवळ चार कोटी पस्तीस लाख रुपये खर्च करण्यात आले. याच प्रकारच्या योजनांसाठी वर्ष १९८३-८४ मध्ये एक कोटी एकवीस लाख रुपये खर्च झाला होता. म्हणजे वर्ष १९८३-९४ शी तुलना करता खर्चाचे प्रमाण जवळ जवळ चौपट झालेले आहे.

५.३.२. आदिवासीमधील निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याने शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती होत नाही. योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यास त्यांना विलंब होतो. तसेच पाहणीत असेही आढळून आले की, आदिवासी शेतकरी हा पैसे भरुन योजनेचा लाभ घेण्यास उत्सुक नसतो,त्यामुळे सहभाग तत्वावरील योजनांना लाभार्थींचा फारसा पाठींबा मिळत नाही.

५.३.३ जिल्हयाच्या वार्षिक योजनेत अनेक नियमित योजनांसाठी दरवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. परंतू एखाद्या वर्षी योजनेसाठी तरतूद उपलब्ध झाली नाही तर ती योजना चांगली असून देखील केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविता येत नाही. जर अशी परवानगी मिळाली तर योग्य होईल, असे अंमलबजावणी अधिकाऱ्यांचे मत पडले. दुसरे असे की, काही वेळेस आर्थिक वर्षाच्या अखेरच्या कालावधीमध्ये योजना राबविण्यासाठी अचानक मोठा निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्यामुळे योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांची तारांबळ उडते व गुणात्मक दर्जा राखणे कठीण होते.

५.३.४ औद्योगिक संस्थेत व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी अर्थसहाय्य देणे (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली) :-या योजनेखाली दरमहा रुपये २४०/- इतके अर्थसहाय्य प्रस्तावित करण्यात आले होते. ही योजना १९९२-९३ मध्ये यशस्वीपणे राबविण्यांत आली. ही योजना सन १९९३-९४ मध्ये मंजूर होऊ शकली नाही, कारण असे लक्षात आले की, विशेष निधीमधून देखील अशा विद्यार्थ्यांना दरमहा विद्यावेतन देण्याची तरतूद आहे. मात्र ही तरतूद दरमहा रु.६०/- रुपये प्रमाणे असल्याने निवास तसेच भोजनाच्या व्यवस्थेसाठी फारची अपूरी वाटते.

५.३.५. प्रशिक्षणासाठी आदिवासी युवक/युवतींना पाठविताना ती संस्था शासन मान्य असलीच पाहिले अशी महत्वाची अट आहे. त्यामुळे शासन मान्यता नसलेल्या परंतू प्रशिक्षण देण्याबाबत नावाजलेल्या असून देखील इतर संस्थामध्ये प्रशिक्षणार्थींना पाठविता येत नाही. अनेकदा तालुक्याच्या ठिकाणी शासनमान्य प्रशिक्षण संस्था नसेल किंवा शासन मान्य संस्थेंतील जागा पूर्ण भरलेल्या असतील तर इतर तालुक्यात प्रशिक्षणार्थींना पाठवावे लागते.

५.३.६ पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी ) :- पोलीस दलात भरती होण्यासाठी आवश्यक असलेली किमान शारिरीक पात्रता, प्रशिक्षणार्थींकडे आवश्यक आहे. या प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या तीन आदिवासी युवकांपैकी दोघेजण किमान शारिरीक पात्रतेअभावी पोलीस दलात प्रवेश मिळवू शकले नाहीत.

५.३.७ प्रशिक्षणाच्या योजनामध्ये वाहनचालक प्रशिक्षण, टंकलेखन प्रशिक्षण, एस.टी.वाहक प्रशिक्षण, शिवणकामाचे प्रशिक्षणा इ.योजनामध्ये आदिवासींचा सहभाग चांगला असल्याचे आढळले.

५.३.८ प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचेमार्फत राबविण्यात येत असलेली सीमीत परिवार योजना आदिवासी लाभार्थी कुटुंबाची आर्थिक व सामाजिक उन्नती होण्यास फायदेशीर ठरणार आहे.

## ५.४ निष्कर्ष :-

५.४.१ ज्या जिल्हयामध्ये आदिवासी जमातीचे प्रमाण जास्त आहे, त्या जिल्हयामध्ये लाभार्थींचे प्रमाण जास्त आढळते. निवडलेल्या तिन्ही जिल्हयामध्ये प्रकर्षाने असेच आढळून आले आहे. (पहा तक्ता क्र.५.१)

५.४.२ लाभार्थी कुटंबातील व्यक्तीचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते. (तक्ता क्र.५.२)

५.४.३ लाभार्थी कुटुंबापैकी ५ टक्के कुटुंबे अल्पभूधारक, १८ टक्के कुटुंबे भूमीहीन, तर ३० टक्के कुटुंबाची जमीनधारणा २.५१ ते ५ एकर इतकी आहे. थोडक्यात भूमीहीन अल्पभूधारक कुटुंबे या योजनेत सहभागी झाल्याचे दिसून आले आहे. (तक्ता क्र.५.४)

५.४.४ १०,०००/- रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेले एकूण ७९ कुटुंबानी शासनाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेच्या (रु.११,०००/-) आतमध्ये ही कुटुंबे समाविष्ट असल्याचे निदर्शनास येते.(तक्ता ५.५)

५.४.५ ८४ लाभार्थी कुटुंबापैकी ५५ लाभार्थी कुटुंबांना (९५ टक्के) आर्थिक फायदा झाल्याचे आढळून आले आहे. तसेच या लाभार्थी कुटुंबांचा, पीव्हीसी पाईप संच,सामुहीक विवाह, अर्थसहाय्य योजना, जनता धोतर व साडीवाटप, आयटीआय प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य, शिलाई यंत्र, तेल/विद्युत पंप दुरुस्ती इ.योजनांकडे कल असल्याचे आढळून आले आहे. (तक्ता ५.७)

५.४.६ काही योजनांचा लाभार्थींनी फायदा करुन घेतला नसल्याचे आढळून आले. उदा.संगणक प्रशिक्षण योजनेतील लाभार्थींचे लग्न झाल्यामुळे प्रशिक्षणाचा वापर झाला नसल्याचे आढळून आले.

५.४.७ प्रकल्प कार्यालयांनी केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत योजनांवर तरतूदीप्रमाणे १०० टक्के खर्च केल्याचे आढळून आले आहे.

५.४.८ निरक्षरता, पैशाची चणचण, रोजगार बुडणे, यामुळे बरेच लाभधारक या योजनांचा फायदा घेण्यास तयार होत नाहीत, असे आढळून आले आहे.

## ५.५ सूचना :-

थोडक्यात या योजनांचा संबंधित लाभधारकांना निश्चित आर्थिक फायदा झाल्याचे दिसून आले आहे. तसेच या निमित्ताने काही सूचना करणे अगत्याचे ठरते.

५.५.१ बहुतांश आदिवासी जनतेस त्यांच्या कल्याणासाठी असलेल्या योजनांची माहिती नसते. याकरिता प्रसार माध्यमाद्वारे योजनांचा प्रसार करावा असे वाटते.

५.५.२ सामुहिक विवाहासाठी अर्थसहाय्य या योजनेत आर्थिक सहाय्य वाढविणे गरजेचे आहे, असे वाटते.

५.५.३ औद्योगिक संस्थेत व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनाची रक्कम अपूरी वाटते. त्यात कालानुरुप वाढ करणे गरजचे आहे.

५.५.४ प्रशिक्षणासाठी जेथे शासनमान्य संस्था नसेल तेथे खाजगी व मान्यता नसलेल्या परंतू नावाजलेल्या संस्थांचा विचार करणे गरजेचे ठरणार असून त्यामुळे खर्चाचे प्रमाणही कमी होईल व प्रशिक्षणार्थींचा निवास व्यवस्थेचा प्रश्नही निकालात निघेल.

५.५.५ पोलीस दलता भरती होण्यासाठी निवड करावयाच्या उमेदवारांची शारिरीक क्षमतेची चाचणी त्या उमेदवाराची निवड करण्यापूर्वी प्रकल्प अधिकाऱ्यांनी करावी.

५.५.६ पीव्हीसी पाईप व वीजपंप यासारख्या अधिकतम खर्चाच्या योजनांसाठी ५० टक्के अनुदानावर लाभार्थ्यांस सहाय्य देतांना शासनाने घालून दिलेली रु.५,०००/- ची मर्यादा भिजणारे क्षेत्र पाण्याच्या उद्गमापासून दूर असल्यास अपूरी पडते.

५.५.७ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचेमार्फत राबविण्यात येत असलेली सिमित परिवार योजना आदिवासी कल्याणाच्या दृष्टीने फारच उपयुक्त असून या योजनेचा आर्थिक फायदा मुले मोठी झाल्यानंतर मिळत असल्याने मिळणारे पैसे मुलांचे भवितव्य घडविण्यासाठी वापरता येणे शक्य होईल. तसेच कुटुंब मर्यादित राखण्याचे अप्रत्यक्ष फायदे देखील मिळू शकतील. त्यामुळे ही योजना इतर प्रकल्प कार्यालयांनी देखील राबवावी असे वाटते. तसेच या योजनेचा कालावधीत जास्त असल्याने लाभार्थींना १६.५ व २२ वर्षाच्या दोन टप्प्यात आर्थिक लाभ मिळावा, असे वाटते.

५.५.८ केंद्रवर्ती अर्थसंकल्पांत प्रकल्प कार्यालयामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. तसेच त्यासाठी मोठा निधी खर्च केला जातो. परंतू बऱ्याचदा अपूऱ्या कर्मचाऱ्यांमुळे राबविलेल्या योजनांचे मूल्यमापन करणे प्रकल्प अधिकाऱ्यांना शक्य होत नाही, तसेच प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांचे पुढे काय झाले, त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणांचा त्यांना रोजगारनिर्मितीसाठी खरोखर उपयोग होऊ शकला किंवा कसे, तसेच उत्पन्न निर्मितीच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींच्या उत्पन्नात राबविलेल्या योजनामुळे निश्चित किती भर पडली याचे मूल्यमापन होऊ शकत नाही.तसेच याबाबत पाठपुरावा करणेही शक्य होत नाही. त्यामुळे बऱ्याचदा प्रकल्प अधिकाऱ्यांचा सहभाग अंमलबजावणी अधिकारी इतकाच असलेला आढळतो. हे चित्र बदलल्यास आदिवासींसाठी असलेल्या योजना खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रगतीसाठी उपकारक ठरु शकेल, असे वाटते.

## *परिशिष्ट-१*

## (अ) केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सूची

*रोजगार निर्मिती/उत्पन्न निर्मिती योजना*

१. शिवणयंत्र खरेदीसाठी अर्थसहाय्य.

२. मेणबत्ती उद्योगासाठी अर्थसहाय्य.

३. खडू उद्योगासाठी अर्थसहाय्य.

४. कुक्कुटपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

५. शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईप पुरविणे.

६. वराहपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

७. बेन्जो संच खरेदीसाठी अर्थसहाय्य.

८. पडीक जमिनीचा विकास करण्यासाठी अर्थसहाय्य.

९. वीट उत्पादकांना अर्थसहाय्य.

१०. तुरडाळ प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना अर्थसहाय्य.

११. रास्तभाव दुकानांसाठी अर्थसहाय्य.

१२. किराणा दुकानांसाठी अर्थसहाय्य.

१३. आदिवासी कारागिरांना सुतार कामाच्या साहित्याचे वाटप.

१४. आदिवासींना शेळीपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

१५. आदिवासीना सिंट्रेला गवत लागवडीसाठी अर्थसहाय्य.

१६. आदिवासी कारागिरांना बुरुड कामासाठी अर्थसहाय्य.

१७. आदिवासी भाजीपाला व्यवसायिकांसाठी अर्थसहाय्य.

१८. आदिवासींना सुकी मासळी व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

१९. आदिवासी युवकांना लाउडस्पिकर खरेदीसाठी अर्थसहाय्य.

२०. पत्रावळी तयार करण्यासाठी अर्थसहाय्य.

२१. आदिवासी मच्छिमारांना जाळी खरेदीसाठी अर्थसहाय्य.

२२. आदिवासी युवकांना लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य.

२३. बांबू लागवडीसाठी अर्थसहाय्य .

२४. घोडा व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

२५. दुध दुभत्यांच्या व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

२६. वनौषधी निर्मिती करणाऱ्या आदिवासी संस्थेस तेलपंप/वीजपंप घेण्यासाठी अर्थसहाय्य.

२७. आदिवासी शेतकऱ्यांना तुती कलमे लागवडीसाठी अर्थसहाय्य.

२८. आदिवासी महिलांना पापड उद्योगासाठी अर्थसहाय्य.

२९. राष्ट्रीय गळीत धान्य विकास कार्यक्रम व तुषार ठिबक सिंचन वाटप.

३०. आदिवासी क्षेत्रात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम/भात खाचरे विकास कार्यक्रम.

३१. आदिवासी महिलांच्या बचतगटातर्फे करवंद/जाम लोणच्याचा नियोजित प्रकल्प राबविणे.

३२. मिनी चक्कीसाठी (पिठाची गिरणी) अर्थसहाय्य.

३३. लाकूड कटाई साहित्य घेणेकामी आदिवासींना आर्थिक मदत.

३४. ५० टक्के अनुदानावर बैलगाडी व बैलजोडी पुरवठा करण्याची योजना.

३५. भाकड/गाभण म्हशींचा पुरवठा.

३६. आदिवासींना मळणी यंत्र खरेदीसाठी अर्थसहाय्य.

३७. रोजगार हमी योजनेअंतर्गत आंबा कलम, काजू कलम, जांभूळ, आंबा कोय लागवड केलेल्या लाभार्थ्यांना ब-८ बाबींखाली अर्थसहाय्य.

३८. विहिर खोलीकरणासाठी आर्थिक मदत.

३९. उपसा जलसिंचन योजनेसाठी आर्थिक मदत.

४०. मिनीट्रक घेण्यासाठी अर्थसहाय्य.

४१. एक वर्ष वयाच्या पारडयांना वाहतूक खर्च अनुदान.

४२. शेत नांगरणीसाठी ट्रॅक्टरचा वापर करण्यासाठी अर्थसहाय्य.

## (ब) केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या योजना

१. हलके व जड वाहनचालक प्रशिक्षण.

२. खडू व मेणबत्ती बनविण्याचे प्रशिक्षण.

३. बालवाडी चालविण्यासाठी प्रशिक्षण.

४. टंकलेखन प्रशिक्षण.

५. एम.पी.एस.सी.परीक्षेसाठी मार्गदर्शक वर्ग.

६. रंगकाम प्रशिक्षण.

७. आश्रमशाळेतील गणित, इंग्रजी, विज्ञान विषयाच्या शिक्षकांना प्रशिक्षण.

८. आदिवासी गवडयांना बायोगॅस बांधकाम प्रशिक्षण.

९. आदिवासी तरुणांना बहुउद्देशीय आरोग्याचे प्रशिक्षण.

१०. आदिवासी तरुणांना एस.टी.वाहक प्रशिक्षण.

११. शासकीय वसतीगृहातील मुलींना शिवणकामाचे प्रशिक्षण.

१२. विद्यार्थ्याचे उजळणी वर्ग घेणे.

१३. हातपंप दुरुस्ती प्रशिक्षण.

१४. आरोग्य सेवापूर्व प्रशिक्षण.

१५. रेशीम उद्योग प्रशिक्षण.

१६. वेतकामाचे प्रशिक्षण.

१७. आदिवासी स्त्रियांना दाईचे प्रशिक्षण देणे.

१८. आदिवासींना इलेक्ट्रॉनिक साहित्य निर्मितीचे प्रशिक्षण.

१९. आदिवासी उमेदवारांना बँक भरतीपूर्व प्रशिक्षण देणे.

२०. आश्रमशाळेतील स्वयंपाकी/कामाठी यांना स्वयंपाकांचे प्रशिक्षण.

२१. चयन आयोगाव्दारे घेण्यात येणाऱ्या लिपिक वर्गीय परीक्षेसाठी अभ्यास वर्ग आयोजित करणे.

२२. आदिवासी युवकांना मोटार सायकल दुरुस्ती प्रशिक्षण.

२३. आदिवासी युवकांना कार्यालयीन कामाचे प्रशिक्षण.

२४. मराठी लघुलेखन प्रशिक्षण.

२५. आदिवासी शेतकऱ्यांना काजू, आंबा लागवड विषयक प्रशिक्षण.

२६. आदिवासी तरुणांना मधमाशी पालन प्रशिक्षण.

२७. आदिवासी तरुणांना डाळींब लागवडीसाठी प्रशिक्षण.

२८. हस्तकला व्यवसाय प्रशिक्षण.

२९. सुतार कामाचे प्रशिक्षण.

३० आदिवासी तरुणांना वायरमन प्रशिक्षण.

३१. आदिवासी तरुणांना टेपरेकार्ड व रेडिओ दुरुस्ती प्रशिक्षण.

३२. आदिवासी युवकांना दूरदर्शन संच दुरुस्ती प्रशिक्षण.

३३. आदिवासी युवकाना भरतीपूर्व प्रशिक्षण ( पोलीस, एस.आर.पी. सैन्य इत्यादी)

३४. आदिवासी युवकांना कॉम्प्युटर प्रशिक्षण.

३५. आदिवासी युवकांना हॅंड कंपांझिंग, बाईडिंग प्रशिक्षण देणे.

३६. आदिवासी तरुणांना फोटोग्राफीचे प्रशिक्षण.

३७. आदिवासी तरुणांना कॅनॉल इन्सपेक्टर प्रशिक्षण.

३८. आदिवासी विद्यार्थ्यांना टेलिफोन ऑपरेटरचे प्रशिक्षण.

३९. आदिवासी महिलांना पारिचारिका प्रशिक्षण देणे.

४०. आदिवासी तरुणांना वेल्डींगचे प्रशिक्षण.

४१. आदिवासीना माळीकाम प्रशिक्षण.

४२. आदिवासींना मोटार रिवाईडींगचे प्रशिक्षण.

४३. आदिवासी महिलांना गालिचा विणकाम प्रशिक्षण.

४४. आदिवासी महिलांना भरतकामाचे प्रशिक्षण.

## (क) मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना

१. आदिवासी कलामहोत्सव व सांस्कृतिक नृत्य मेळावे आयोजित करणे.

२. मुख्याध्यापकांची शिबिरे व शिक्षकांचे उद्बोधन प्रशिक्षण वग आयोजित करणे.

३. भजन मंडळांना भजन साहित्य पुरविणे.

४. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे.

५. आदिवासींचे सामुदायिक विवाह आयोजित करुन अर्थसहाय्य करणे.

६. आदिवासींचे स्वास्थ्य सुधारणा कार्यक्रमास आर्थिक मदत व शिबिरे आयोजित करणे.

७. आदिवासींच्या मानसिक व शारिरीक विकासासाठी व्यसनमुक्ती मेळावे आयोजित करणे.

८. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी मेळावे आयोजित करणे.

९. आदिवासींच्या शेतकरी मेळाव्यांसाठी अर्थसहाय्य करणे.

१०. १० वी नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उजळणी वर्ग आयोजित करणे.

११. आदिवासींच्या कलापथकांना आर्थिक मदत करणे.

१२. आदिवासी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी वादविवाद स्पर्धा आयोजित करणे.

१३. साक्षरता मोहिम व सुसंस्कार केंद्र.

१४. आदिवासी मेळाव्याचे आयोजन करणे व मेळाव्यातील सहभागी आदिवासींना जनता साडी व धोतर संच यांचे वाटप.

१५. आदिवासी लाभार्थ्यांना नोकरी/शिक्षण मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी अर्थसहाय्य.

१६. शासकीय आश्रमशाळेवर पालक मेळावे आयोजित करणे.

१७. शासकीय आश्रमशाळा स्तरावर क्रीडा व नैपुण्यवान विद्यार्थ्यांचे संशोधन करण्यासाठी क्रीडा शिबिरे आयोजित करणे.

१८. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवकांना अर्थसहाय्य करणे.

१९. शासकीय आश्रमशाळांना रंगीत दूरदर्शन संच (डिश अँटेनासह) पुरवठा करणे.

२०. आदिवासी सुशिक्षित युवकांना सायकल व दोन बँड रेडिओचा पुरवठा करणे.

२१. शासकीयआश्रमशाळा स्तरावर ग्रंथालयीन पुस्तकांचा पुरवठा करणे

२२. नक्षलवादी क्षेत्रातील लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे

२३. सिमीत परिवार (परिसीमा) योजना (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,गडचिरोली)

## (ड) कल्याणात्मक योजना

१. बालवाडीसाठी खेळणी पुरविणे.

२. आदिवासी अपघात ग्रस्तांना सहाय्य.

३. आदिवासींना तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य.

४. आदिवासी जोडप्यांना संसारोपयागी वस्तुंचा पुरवठा.

५. आदिवासींच्या घरांना विद्युत मीटरसाठी अनुदान तसेच वीज पॉईंट फिटींग करणे.

६. आदिवासी आपदग्रस्तांना अर्थसहाय्य.

७. आदिवासींसाठी पिण्याच्या पाण्याच्या सोयी उपलब्ध करुन देणे.

८. आदिवासीं अपंगांना तीन चाकी सायकल पुरविणे.

९. आदिवासींना घरबांधणीसाठी बांबू पुरविणे.

१०. कुपोषणामुळे बालमृत्यु झालेल्या व्यक्तींच्या कुटुबांना व ग्रेड ३ व ४चे बालकांच्या पालकांना १ पोते ज्वारी, २५ किलो तुरदाळ व २५ किलो चनाडाळ पुरविण्याची योजना.

११. कुपोषण ग्रस्तांना औषधोपचार व व्हिटॅमिन्सचा पुरवठा करणे.

१२. कुपोषणग्रस्तांच्या आईवडिलांना जेवण देणे.

१३ मूकबधिर विद्यालयातील मुला-मुलींना श्रवणयंत्रे पुरविणे.

१४. अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या खिचडींवर तेल, मीठ, हळद, मोहरी देणे.

१५. अंगणवाडी केंद्रावर दूध व खिचडी तयार करण्यासाठी भांडी देणे.

१६. दूधाच्या पावडरचे वाटप.

१७. आदिवासींच्या घरांना टिनपत्रे पुरवणे.

१८. आदिवासी होतकरु खेळाडूंना अर्थसहाय्य.

१९. पावसाळयात नदीवरुन ये-जा करणाऱ्या आदिवासींना डोंगे पुरविणे.

२०. आदिवासी विद्यार्थ्याकरिता धनुर्विद्या प्रशिक्षणासाठी धनुर्विद्या साहित्य पुरवठा करणे.

***

परिशिष्ट - २

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
## महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

### केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची मूल्यमापन पाहणी

प्रपत्र क्रमांक-[१]

[लाभार्थ्यांची माहिती]

### चौक-१

सर्वसाधारण माहिती

१.१] जिल्हा : १.२] तालुका :

१.३] ए.आ.वि.प्र. : १.४] अ] गावाचे नांव:

ब] पाडा :

१.५] अ] लाभ धारकाचे नांव :

ब] निवड क्रमांक :

१.६] जमातीचे नांव :

१.७] लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील आहे काय ? होय/नाही

### चौक-२

कुटुंबाची माहिती

| अ.क्र. १ | बाब २ | पुरुष ३ | स्त्रिया ४ | एकूण ५ |
|---|---|---|---|---|
| १. | कुटुंबातील एकूण व्यक्ती | | | |
| २. | कुटुंबातील साक्षर व्यक्ती | | | |
| ३. | कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती | | | |
| ४. | कुटुंबातील एकूण मुले | | | |
| ५. | शाळेत जाणारी मुले | | | |

## चौक-३

### कुटुंबाची शेती व उत्पन्न

३.१]

| अ.क्र. | बाब | बागायत | | जिरायत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकर | गुंठे | एकर | गुंठे | एकर | गुंठे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | मालकीची | | | | | | |
| २. | खंडाची | | | | | | |
| ३. | जंगलखात्याची अतिक्रमण केलेली | | | | | | |
| ४. | महसूल खात्याची अतिक्रमण केलेली | | | | | | |
| ५. | शासनाने पडित जमीन वाटप केलेली | | | | | | |
| ६. | इतर | | | | | | |
| | एकूण | | | | | | |

३.२] सिंचनाची साधने : विहिर/ओढा/नदी/कालवा/इतर

३.३] अ] कुटुंबाचा मुख्य व्यवसाय : ____________________

ब] दुय्यम व्यवसाय : ____________________

क] वार्षिक उत्पन्न : १. शेती ..................

२. शेतमजुरी..................

३. पशुपालन..................

४. जंगल जमीन..................

५. इतर..................

६. एकूण ..................

३.४] कुटुंबाच्या मालकीचे पशुधन

| बाब | गाई | [illegible] | म्हशी | रेडे | शेळया | मेंढया | कोंबडया | डुकरे | बदके | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| देशी [संख्या] | | | | | | | | | | |
| संकरित/ सुधारित [संख्या] | | | | | | | | | | |

चौक-४

४.१] कुटुंबाने लाभ घेतलेल्या योजना

| अ.क्र. १ | बाब २ | संख्या ३ | कोणाकडून प्राप्त ४ |
|---|---|---|---|
| १. | शेतीसाठी अ] वीज पंप | | |
| | ब] डिझेल इंजिन | | |
| २. | कृषि संलग्न व पशुसंवर्धन | | |
| | अ] गायी/म्हशी | | |
| | ब] कुक्कुटपालन | | |
| | क] शेळ्या/मेंढया | | |
| | ड] निविष्ठा वाटप | | |
| | इ] इतर | | |
| | १........... | | |
| | २........... | | |
| | ३........... | | |
| ३. | केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत घेतलेल्या योजना | | |
| | १]............. | | |
| | २]............. | | |
| | ३]............. | | |
| | ४]............. | | |
| ४. | फायदा घेतलेल्या इतर योजना [विभागातील] | | |

४.२] केंद्रवर्ती अर्थ संकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या योजनांची सविस्तर माहिती.

| अ.क्र. | योजनेचे नांव | मिळालेली रक्कम[रू.] | | | महिना | कोणत्या स्वरूपात |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | अनुदान | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## चौक-५

### केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत घेतल्या जाणाऱ्या योजनांविषयी लाभार्थींचे अभिप्राय

५.१] या योजनांचा लाभ मिळविण्यात आपणास काही अडचणी आल्या का?

---

५.२] उपरोक्त अडचणींचे निवारण करण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले?

---

५.३] कोणती योजना आपणांस लाभदायक वाटली ?

---

५.४] सदर योजनेच्या स्वरूपात आपणांस काही बदल हवासा वाटतो काय ? होय / नाही

५.५] बदल हवासा वाटल्यास, कोणत्या स्वरूपाचा ? [विषद करा]

---

---

---

५.६] आपल्या कुटुंबाच्या आर्थिक विकासासाठी इतर कोणत्या योजना राबविण्यात याव्यात असे आपणास वाटते ?

______________________________

______________________________

५.७] कुटुंबांच्या काही विशिष्ट गरजा

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

५. ______________________________

६. ______________________________

५.८] सर्वेक्षण अधिकाऱ्याचे मत .

अ] लाभार्थ्यांनी या योजनांचा खरोखर फायदा घेतला काय?

होय / नाही

ब] नसल्यास, फायदा न होण्याची कारणे -

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

सर्वेक्षणाची तारीख

सही

हुद्दा

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची मूल्यमापन पाहणी

प्रपत्र क्रमांक [१]

[योजना राबविणाऱ्या यंत्रणेसाठी]

चौक-१

सर्वसाधारण माहिती

१] जिल्हा : ________________ २] तालुका : ________________

३] योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव : ________________

हुद्दा : ________________

कार्यक्षेत्र : ________________

चौक-२

२.१] राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती.

| अ.क्र. | योजनेचे नांव | सन १९ | | सन १९ | | सन १९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

२.२]

अ]या योजनांसाठी सध्या ठरविण्यात आलेली अर्थ सहाय्य मर्यादा लाभार्थींच्या विकासासाठी योग्य आहे काय ? होय / नाही

ब] नसल्यास यामध्ये आपणास काय बदल
सुचवावासा वाटतो.

२.३] या योजनांची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

२.४] अ] या योजनांसाठी आदिवासींचा प्रतिसाद चांगला आहे काय ? : होय / नाही

ब] नसल्यास प्रतिसाद वाढविण्यासाठी कोणती उपाययोजना आपणांस सुचवाविशी वाटते ? : ---------------------------

२.५] या क्षेत्रात केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत आणखी कोणत्या नवीन योजना राबविता येतील असे तुम्हाला वाटते ?

१. ---------------------------------------------------------------

२. ---------------------------------------------------------------

३. ---------------------------------------------------------------

२.६] योजनेच्या कार्यवाहीमुळे दारिद्र्य रेषेच्या वर आलेल्या कुटुंबांची संख्या -------------

सर्वेक्षण तारीख　　　　　　　　सही